म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रह

लेखक नि. अ.

सन

पुस्तकाचें नांव ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका किंवा मराठ्यांच्या इतिहासाविषयी

४८

संक्र

ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका किंवा मराठ्यांचा इतिहास विषयी निरूपण.

निबंध

दातेसूची - पान ६६४

या पुस्तकाची नोंद १८८६ सन अशी आ
प्रस्तावना - शेवटी १८८४ सन, अशी
दिसते.

२८-१२

1

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

सन १८६७साली मी पुणें कालेजांत प्रथम सालीच गेलेला
"ज्यूनियर स्टूडंट," ह्मणजे नवीन विद्यार्थी होतों. तेव्हां
ाह्मी विद्यार्थ्यांनीं, लिहिण्याबोलण्याचें कामीं संवय वाढून
ापली सुधारणा व्हावी या हेतूनें, "पूना यंग मेन्स असो
ायेशन," ह्मणजे पुण्यांतील तरूण लोकांची सभा, या
द्धावें एक निबंध वाचून नानाविषयांवर वादविवाद करणारी
ंडळी स्थापिली होती. या मंडळीपुढें निबंधवाचण्याची मा-
वि पाळी जेव्हां आली तेव्हां मी हा पुढील निबंध लिहून
ाचिला. त्या प्रसंगीं अध्यक्षस्थान कैलासवासी रा० रा०
ृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं शोभिवंत केलें होतें; व श्रोते
मंडळींत रा. रा शंकर पांडुरंग पंडित होते. या उभय वि-
द्वानांनीं माझ्या निबंधाची ते दिवशीं पुष्कळ तारीफ केली
ापविण्यास योग्य आहे असें मत दिलें. सांप्रतचे
ा. ब. शंकररावजी पंडित यांनीं माझा निबंध इंदुप्र-
. रा. जनार्दनपंत गाडगीळ यांच्या विद्यमानें छाप-
ि निबंध छापविण्याचा हक्क माझ्याकडेसच राहिला
ा. रा. पुणें येथील 'किताब खान्याचे व्यव-
था ीं मागितल्यावरून, ही दुसरी आवृत्ति, अल्प
स्वल्प करून, छापण्यास मीं त्यांस मंजुरी दिली आहे.
ा व्येतिहास संग्रह नामक मासिक पुस्तकांत
ज्या म ा व लेख छापिले आहेत त्यावरून असें
दिसून ा. जीं साधनें आमचे पाशीं निबंध लिहिण्याचे
वेळीं हो उपयोग आह्मीं तेव्हांच्या आमच्या श-
क्तीच्या म ाप्रमाणें व या अल्प निबंधाचे विस्ताराचे माना-
प्रमाणें, बराच चांगला केलेला आहे. यासंबंधानें एक विशेष
येथें सांगितला पाहिजे—तो हाकीं त्यावेळेस बहुतेक पाचकां-

स, अलिकडे जीं मराठ्यांचे इतिहासाचीं साधनें एकत्र करून छापण्यांत आलीं आहेत तीं अश्रुत व अदृष्ट असल्यामुळे, त्यांचा आह्मीं उपयोग प्रामाणिकपणानें कशावरून केला नसेल, अशी शंका घेण्यास जागा होती व ते तशी शंका घेतील अशी भीति माझे मनांत होती म्हणून, माझे भिडस्त स्वभावास अनुसरून, मीं या निबंधांत कित्येक ठिकाणीं संदिग्धसें लिहिलें आहे. मीं जेव्हां हा निबंध मूळ लिहिला तेव्हां आपल्यावर आलेली पाळी कशी तरी टाळावी, म्हणूनच फार घाईनें लिहिला. तो विद्वानांस मान्य होईल अशी उमेद मला मुळींच नव्हती. पुढें जेव्हां तो छापण्याचें ठरलें तेव्हां त्यावर मी माझें नांव घालण्यासही धजलों नाहीं. मनांत शंका कीं आपण नवीन व्यासंगी; त्यांत ज्या कांहीं बखरा आपणांस आपले पूर्वजांचे कागदपत्रांत मिळाल्या त्या 'हरिभक्ति परायण हेमाडपंत' यांनीं आपले देशीं आणिलेल्या असुरी लिपींत लिहिलेल्या व आपला अभ्यास सरकारी मराठी शाळेंत झाला असल्यामुळें देवांच्या नागरी लीपिशिवाय इतर लिपींशीं आपलें वरेंच वांकडें, तेव्हां कोठें अर्थाचे अनर्थ आपल्याहातून झालेच असतील व पुढें त्याच्या बद्दल कदाचित् खरमरीत टीका होईल.

या आवृत्तीच्या वेळीं हा निबंध पुन्हा वाचला तेव्हां पूर्व भीति बरेच अंशीं निरर्थक होती असें वाटलें. परंतु पूर्वीची साशंकित भाषा तशीच बहुधा ठेविली आहे. त्या भाषेंत पुष्कळ दोष असतील. परंतु कोणत्याही कामांत प्रथम प्रसंगीं माणसाचे मनाची साहस व भीति यांहींकरून एकेच समयीं मिश्रित अशी जी स्थिती असते ती ज्याची त्यास सदैव रमणीयच भासते. या वृत्तीस अनुसरल्यामुळें जे दोष घडले असतील त्याची वाचक क्षमा करतील अशी आशा आहे. मुक्काम पुणें. ता. २८ माहे डिसेंबर सन१८९१ इसवी.

॥ श्री ॥

# कप्तान ग्रांट डफ्कृत मराठ्यांचे बखरीवर टीका अथवा मराठ्यांचें इतिहासाविषयीं थोडेसें निरूपण.

गृहस्थहो,

आज आपल्यापुढें ज्या विषयावर मी निबंध वाचणार तो विषय आपणांस पक्का माहीत असेलच; व तो माहीत नसल्यास तें आपणांस भूषणास्पद आहे असें नाहीं. आज मी आपल्या देशाचे म्हणजे मराठ्यांचे इतिहासाचे संबंधानें दोन शब्द बोलूं इच्छितों. हा निबंध जरी लहान आहे तरी यांत नवीन गोष्टींचा थोडा तरी समावेश होईल; व कोठेंकोठें या विषयावर जीं मुकरर ठरलेलीं मतें आहेत, त्यांहून आमचीं मतें वेगळीं दृष्टोत्पतीस येतील; इत्यादि कारणांमुळें आपलें पूर्ण अवधान या निबंधाकडे मागणें इष्ट आहे.

प्रथमतः मोठी दुःखकारक गोष्ट ही आहे कीं, या विषयावर ग्रंथ म्हणून फार थोडे आहेत; व जे थोडे कांहीं आहेत त्यांची गणना उत्तम प्रतींत होणार नाहीं; मध्यम प्रतींतही त्यांस सामान्यच म्हणण्यास हरकत नाहीं. केवळ याच विषयावर ग्रंथ ह्मटला तर ग्रांट डफ्कृत मराठ्यांचे बखरीशिवाय दुसरा नाहीं. आमचे माजी बाळगंगाधर शास्त्री यांनीं त्यांचे लौकिकास साजेल असें थोडें बहुत लिहिलें आहे. "हिंदुस्थानचे इतिहास" या नांवाचे इंग्रजींत ग्रंथ पुष्कळ आहेत; परंतु एका ग्रंथांत जी माहिती सांगितली असत्ये तिजपेक्षां दुसऱ्या ग्रंथांत विशेष म्हणण्यासारखी जास्ती नसत्ये. इंग्रजांचे कारकिर्दीचें निरूपणांत बं-

रेंच जास्ती कमी आढळतें; परंतु मराठ्यांसंबंधी जें असतें तें बहुधा एकच. ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे कीं, या विषयावर सर्वांचें दुर्लक्ष आहे; युरोपियनांचें तर असो, परंतु हिंदुस्थानांतील लोकांचें देखील दुर्लक्ष ! मराठी लोकांचें देखील दुर्लक्ष !! आमचे शाळेंतील मुलास, व आमचे कालेजांतील विद्यार्थ्यांस ग्रीस, रोम आणि इंग्लंड इत्यादि देशांची माहिती बरी असत्ये; परंतु त्यांच्या स्वदेशाची माहिती फार कमी असत्ये. मागें कांहीं दिवस ग्रांटडफ साहेब यांच्या ग्रंथाचें भांपातर मराठी शाळांत "वाचनबुक" असे; परंतु मुलांनीं शिवाजीचे कारकिर्दीपर्यंत वाचून कांहीं ज्ञान संपादिलें न संपादिलें, त्यांचें मनांत आपले देशाचे शूर पुरुषांविषयीं कांहीं पूज्य बुद्धि आली न आली इतक्यांतच ते इंग्रजी शिकण्यास प्रारंभ करीत; व थोडेच दिवसांत या विषयावरची माहिती विसरून जात. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, माजी डायरेक्टर हावर्ड व ग्रांट साहेब यांनीं मराठी कवितेस जसें उत्तेजन दिलें, तसें या मराठ्यांच्या इतिहासास दिलें नाहीं. सांप्रत बहुतेक शाळांतून आणि अलीकडे येथील ट्रेनिंग कालेजांतही महाराष्ट्र "देशाच्या वर्णना" पेक्षां मोठें पुस्तक शिकविण्याची जरूर आहे, असें कोणास वाटत नाहीं. असो हा कामासंबंधीं प्रश्न आहे; आणि यांत अधिकारी यांनीं आपली चूक कशी सुधरावी हें आह्मी त्यांचें त्याजकडेच ठेवितों.

डफकृत मराठ्यांचे बखरीवर अभिप्राय.

मी मागें असें सांगितलें आहे कीं, जे थोडेबहुत या विषयावर ग्रंथ लिहिलेले आहेत, त्यांस उत्तम तर नाहींच, परंतु मध्यम असेंही मोठ्या प्रयासानें ह्मणावें लागेल. ग्रांट डफ साहेबाचें इतिहासाविषयीं आमचें मत याहून निराळें आहे असें नाहीं. तो ग्रंथ मोठा गूढ अथवा समर्पक आहे असें नाहीं; त्या साहेबास जी मदत मिळाली व

जे हस्तलिखित ग्रंथ सांपडले, व ज्या सनदा मिळाल्या, त्यांचा विचार केला असतां त्यांवरही मोठी सुंदर इमारत उठली असें ह्मणवणार नाहीं. ज्या कोणी कधींही हस्तलिखित 'शिवाजी महाराजाची बखर,' व 'पुण्याची अथवा पेशव्यांची बखर,' 'खरड्याचे लढाईची बखर,' व मल्हारराव होळकर यांनीं पानपतच्या लढाईविषयीं बाळाजी बाजीराव यांस सरकारी नात्यानें पाठविलेली उत्तम 'थैली,' इत्यादि ग्रंथ पाहिले असतील, त्यास आमचें ह्मणणें केवळ सयुक्तिक आहे असें वाटेल; आणि वर सांगितलेल्या लेखांत स्वराज्यप्रीति व धर्म यांचे अभिमानानें जो एक प्रकारचा रंग उठला आहे, तोही साहेबाचे ग्रंथांत नाहीं असेंही वाटेल. डफ् साहेबाचे ग्रंथांत समर्पक सर्व विषयांचें विवेचन नाहीं. त्या ग्रंथांत हिंदु लोकांच्या धर्माविषयीं व हिंदूंच्या वेदांतसंबंधाविषयीं कांहींच लिहिलें नाहीं. हिंदुस्थानांतील कोणच्याही भागांतील हिंदु लोकांच्या इतिहासांत या विषयावर दोन शब्द असणें इष्ट आहे.

नर्मदेच्या दक्षिणतीरीं चालणारा जो शक त्याचा मानलेला शककर्ता जो शालिवाहन त्याच्या नांवाच्या संबंधानें संस्कृतांत व प्राकृतांत जे अति प्रसिद्ध ग्रंथ आहेत त्यांचें सुद्धां नांव या ग्रंथांत नाहीं. गुणाढ्य 'बृहत्कथा' ग्रंथाचा कर्ता हा शालीवाहननामक राजाचा कारभारी होता असें मानिलें आहे. यानें "पैशाची" भाषेंत कथांची सात प्रकरणें रचून त्या सर्वांचें नांव "बृहत्कथा" असें ठेविलें व तो ग्रंथ आपला राजा जो शालीवाहन त्यास नजर केला. परंतु तो ग्रंथ रक्ताचे शाईनें लिहिला होता ह्मणून त्या राजानें नाकारला. ह्मणून गुणाढ्यानें तो जाळून टाकण्यास आरंभ केला. याप्रमाणें साहा प्रकरणें जाळल्यावर राजास वर्तमान कळलें कीं गुणाढ्याचा ग्रंथ अद्वितीय आहे. तेव्हां अवशिष्ट राहिलेला भाग राजानें मागून घेऊन रक्षिला. या रक्षिलेल्या अवशिष्ट ग्रंथा

वरून त्याचे दोन संक्षेपरुप ग्रंथ संस्कृत भाषेंत झालेले आहेत. 'कथासरित् सागर' या नामें ते प्रसिद्ध आहेत. सोमदेव व क्षेमसागर हे या ग्रंथांचे कर्ते होत. आह्मास वाटतें कीं सर्व पृथ्वींत जेवढी ह्मणून मनोवेधक व खुबीदार गोष्ट चालू आहे तिचें मूळ या कथांत नाहीं असें होणें कठीण. पुराणांचा मानलेला कर्ता जो व्यास त्याची ग्रंथरचनेची इच्छा तृप्त न झाल्यामुळें गुणाढ्यरूपें त्याचें पुनर्जन्म झालें अशी संस्कृत कवींची समजूत आहे; तीवरून या ग्रंथाची योग्यता ते किती मानितात हें सहज लक्षांत येईल. गुणाढ्याविषयीं गोवर्धनानें खालीं दिलेला श्लोक केला आहे. तो वाचून वाचकांस "Three poets in three distant ages born" इत्यादि सुप्रसिद्ध ओळींची आठवण झाल्यावांचून रहाणार नाहीं.

श्रीरामायण भारत
बृहत्कथानां कवीन् नमस्कुर्यः
त्रिस्रोता इव सरसा
सरस्वती स्फुरती यैर्भिन्ना

या शिवाय जुन्या महाराष्ट्री भाषेत सप्तशति या नांवें एक ग्रंथ शालिवाहनाचे वंशांत झालेल्या एका राजानें केलेला सुप्रसिद्ध आहे. या शालिवाहन* राजांच्या अमलांत प्राकृत व महाराष्ट्रीय भाषेंत ग्रंथ होऊं लागले असें दिसतें. कथा व कविता या विषयांतच आपल्या देशांत उत्तम ग्रंथकार झाले असें नाहीं. प्राकृत भाषेचा व्याकरणकार वररुचि तोही या देशांत झाला; व ज्योतिष शास्त्रांत महा प्रसिद्ध जो भास्कराचार्य तो व त्याचे वंशज हे ही आपलेच देशांत जन्म पावले. हेमाद्रि, ज्यांस मराठे लोक हेमाडपंत म्हणतात, ते देवगडचे राजे महादेव व रामचंद्र यादव त्यांचे चिटणीस किंवा कारभारी होते. याचा चतुर्वर्ग चिंतामणी ग्रंथ प्रसिद्ध आहे. हेमाडपंत वत्सगोत्री

* परिशिष्ट 1 लें पाहा.

ब्राह्मण होता व तो विद्वानांचा पोशींदा होता. मोडीलीपि लंकेंतून यादेशीं यानें आणिली अशी ख्याति आहे. मराठी बखरांत हेमाडपंताचें नांवापुढें ' हरिभक्तपरायण ' असें लिहिलेलें असतें. हें विशेषण हरिदास किंवा गोसावि कथा करणार यांचे नांवास जोडलेलें असतें यापदाचा लाभ हेमाद्रीस कोणप्रकारें झाला हें समजत नाहीं. हेमाडपंत धार्मिकवृत्तीचा होता ह्मणून त्यास कदाचित् हा लाभ झाला असेल. ईसवी सनांत १२ वे शतकाचे सुरामास हेमाद्रि कारभार करीत होता असें दिसतें. सांप्रत जी मराठी भाषा आपण बोलतों तिचा उत्कर्ष हेमाडपंतापूर्वी दोन चार शतकां पासून सुरु असला पाहिजे; कारण ईसवीसन १२९० साली आपले भाषेंत ज्ञानदेवकृत ज्ञानेश्वरी ग्रंथ झाला. या सर्व हकिकतीवरून महाराष्ट्रदेशांत सुमारें १८०० वर्षांत जे ग्रंथकार संस्कृत, प्राकृत व महाराष्ट्रभाषेंत झाले त्यांजविषयीं ह्मणण्यासारखा लेख डफ् साहेबाचे ग्रंथांत नाहीं असें दिसून येईल.

या ग्रंथांत केवळ मराठी ग्रंथांविषयीं देखील कांहीं लिहिलें नाहीं. आतां हें ग्रंथ केवळ संस्कृताच्या आधारानें केले आहेत, व त्यांत संस्कृतांतील रस उत्तम उतरला नाहीं, ते फार थोडे आहेत, व उत्तमही नाहींत; इत्यादि गोष्टी आह्मी मान्य करतों. परंतु ते ग्रंथ कसेही असले तरी, त्या ग्रंथांविषयीं व त्यांचे कर्त्यांविषयीं थोडें बहुत तरी लिहिल्याशिवाय कोणत्याही मराठ्याचे बखरीचा ग्रंथ पूर्ण होणार नाहीं; हें उघड आहे.

प्राचीनकालीं त्या दक्षिण देशांत व विशेषतः आपल्या महाराष्ट्र देशांत आर्य लोकांच्या वसाहती केव्हां व कशा झाल्या, कोणकोणते राजवंश कसकसे व केव्हां यांत प्रबळ झाले, त्यांचे वंशांत आतां कोण उरले आहेत, इत्यादि प्राचीन इतिहासाची माहिती संगतवार जशी असावी तशी नाहीं; इतकेंच नाहीं तर सांप्रत प्रसिद्ध असलेले भोसले, प-

वार, महाडीक, शिरके इत्यादि पंचकूळीचे, छत्तीस कुळीचे व शाण्णव कुळीचे समस्त मराठे हे कोण व कोठील, यांत कोणकोणचीं कुळें पूर्वेकडून राजवंशांतून निघून येऊन या देशीं वस्ती करतीं झालीं, इत्यादि उपलब्ध इतिहास यांत चांगला दिलेला नाहीं. आपले ग्रंथकार साहेब सातारचे छत्रपतीचे दरबारी एजंट होते व सातारच्या कित्येक जात्याभिमानि राजांनीं या गोष्टीची पुष्कळच शास्त्रेशास्त्र केलेली होती; या गोष्टी लक्षांत आणिल्या ह्मणजे या बाबतींत साहेबांनीं जें मौन्य धारण केलें आहे, तें कांहीं अंशीं आश्चर्यकारक दिसतें.* साहेब ब्राह्मण असते तर इतकें आश्चर्य वाटावयाचें कारण नव्हतें. कारण इतर जाती पुरुषाच्या बाहू व पादापासून निघाल्या व स्वजात मुखापासून निघाली, या पलिकडे कुळांच्या मुळाच्या शोधांत ते फारसे पडत नसतात. हिंदुस्थानांतील राजपुत व मऱ्हाठे यांची वृत्ति अशी उदासीन या कामीं नाहीं. सूर्यचंद्रापासून तो थेट प्रस्तुत अल्पवयी फलाणे सिंग अथवा राव यापावेतों ओढलेल्या लांब लांब वंशावळी मिरविणारीं व अशा वंशावळी रचणारे व गाणारे जे भाट त्यास पूज्य मानणारीं कुळें या क्षत्रीय कर्मोपलंबी लोकांत बहुत आहेत व त्यांचें ह्मणणें ऐकून घेऊन तें जमेस लाऊन त्याचा गोषवारा आपल्या वाचकांपुढें ठेवणें हें सर्व हिंदुजातीस सारखेच लेखणाऱ्या साहेबांस असमर्थ करितां आलें असें. ज्याप्रमाणें कर्नल विलफोर्ड साहेब वटॉड साहेब यांनीं राजस्थानचे योध्यांच्या व राजांच्या संबंधें केलें आहे, तसेंच ग्रांट साहेबांनीं केलें असतें तर कांहीं ववागें होतें असें आह्मास वाटत नाहीं. *

'आर्म' साहेबांनीं "इंग्रजांच्या लष्करासंबंधीं हिंदुस्थानाचा इतिहास" या नांवाचें जें एक अतिशयच मोठें पुस्तक केलें आहे, व ज्या ग्रंथाचें नांव डफ साहेबांचें

---

* परिशिष्ट २ रें पहा.

ग्रंथांत वारंवार निघतें, त्या ग्रंथाचे नांवाप्रमाणेंच प्रस्तुत ग्रंथास "मराठ्यांचे मोहिमांचा इतिहास" असें ह्मटल्यास देखील चालेल. त्यांत भेद इतकाच कीं आमच्या इतिहासकारास या देशाचा अभिमान स्वराज्याप्रमाणें नसल्यामुळें त्यानें व्यक्तिसंबंधाच्या शौर्याच्या व युक्तिप्रयुक्तिच्या व धूर्ततेच्या चटकदार गोष्टी बहुतेक वगळल्या आहेत. अशा गोष्टींचा भरणा "पेशव्यांचे" बखरींत मौजेचा आहे. इंग्रज लोक त्यांच्या देशांतील लोकांस, हिंदुस्थानांतील लोकांचीं नांवें पुस्तकांत बहुत आल्यास, वाचण्याचा कंटाळा येतो ह्मणून असल्या कथा मुद्दाम गाळतात. परंतु असें केल्यानें महापुरुषांचें चरित्राचें एक साधन नष्ट केल्यासारिखें होतें. व तसें होणें इष्ट नाहीं; कारण हीं चरित्रें ह्मणजे इतिहासाचें केवळ हृद्गत होय.

वर सांगितल्याप्रमाणें या ग्रंथांतील कांहीं व्यंगें आह्मी दाखविलीं ह्मणून त्या ग्रंथाविषयीं पूज्य बुद्धि कोणापेक्षांही आमची कमी आहे असें कोणीं कादीमात्रही समजूं नये. त्या ग्रंथकर्त्यास ज्या ज्या अडचणी आल्या त्याही सर्व आमच्या लक्षांत आहेत. या विषयावर ग्रंथ लिहिण्यास प्रथम त्यांनींच प्रयत्न केला; व कोणत्याही प्रथम प्रयत्नाशीं ताडून पाहिलें असतां हा त्यांचा ग्रंथ चांगलाच झाला, असेंही कदाचित् म्हणणें भाग पडेल. त्यांनी ग्रंथ करून आज बरींच वर्षें झालीं असून या विषयावर दुसरे कोणीही ग्रंथ करण्यास धजलें नाहीं, ही गोष्टही साहेबाचे विद्येची व मेहनतीची साक्ष आहे. या ग्रंथापासून या साहेबास एक पैशाचासुद्धां लाभ न होतां अजारी असतां सतत फार मेहनत करावी लागली. इत्यादि गोष्टींकरितां, व त्यांना ग्रंथाचें नांव बदला म्हणजे तुह्मास दोन पैशांची प्राप्ति होईल असें त्याचे मित्र सुचवीत असतां त्यानीं तसें केलें नाहीं, ह्मणोन त्यांचे या देशावर अनंत

उपकार आहेत. या सर्व गोष्टींकरितां मीं तर त्यांचे आभार इतके मानितों कीं, विषयांतर व विस्तार होत असतां, त्यांनीं एका कामगारास जें एक पत्र पाठविलें तें मीं तेथें उतरून घेतों. तें पत्र ऐकिल्यावर साहेबांचे वर्तीनें मला जास्त बोलणें नको. तें पत्र " या ग्रंथाची तुह्मी इतकी काळजी बाळगितां ह्मणून, व कदाचित् तुह्मीही हिंदुस्थानसंबंधीं कांहीं ग्रंथ कराल ह्मणून, या ग्रंथाची मूळ उत्पत्ति व प्रसरण कसें झालें हें सांगावेंसें मला वाटतें. जर मिस्टर एल्‌फिन्स्टन् साहेबाची बदली दक्षिणेंतून मुंबईस त्वरेनें झाली तशी झाली नसती तर, हें ग्रंथ करण्याचें काम त्यांणींच पतकरिलें असतें; व ते या कामास योग्यही खरे.

" मराठ्यांचें जें अतिविलक्षण राज्य व ज्याची हकीकत केवळ लोकांस बरवर माहित आहे, त्यासंबंधीं लेख मिळविण्याची ही जी एकच संधी आली ती जाऊन सर्व लेख हातचे जातील, असें सर टामस् मनरो व एलफिन्स्टन साहेब यांनीं सुचविलें त्यावरून मी लेख जमा करूं लागलों; जसजसे मी लेख मिळवीत गेलों तसतसे ते अपुरते असतांही पुढें आतां आपणांस कोणत्या लेखांची अपेक्षा आहे हें समजण्याकरितां, त्यांस क्रमवार मला लावावे लागले आणि मग थोडक्यांत मला महाराष्ट्र देशाच्या हद्दींत व तसेंच सर्व हिंदुस्थानभर हस्तक ठेवणें भाग पडलें. या पुस्तकाचा बहुतेक भाग मी माझीं इतर कामें सतत बारा किंवा चौदा तास ( हीं कामें कशीं असतात हें आपणांस माहीतच आहे ) करीत असतां लिहिला; पुष्कळ पुडकीं वाचलीं असतांही, ज्यांत विश्वास ठेवण्यासारखी एकही गोष्ट सांपडूं नये, अशा पुष्कळ पुडक्यांतून जे लेख काढिले होते त्यांचें भाषांतर करण्याचें कामीं मला जे मजबरोबर गृहस्थ होते व ज्यांस मजसारिखेंच जबर काम करावें लागे, त्यांनीं मदत केली. त्यांत ' डब्ल्यू. आर. मॉरिस् यांनीं मुख्यत्वें पुष्कळ मदत केली.

"या पुस्तकांत जें पुष्कळ ठिकाणीं फार दुर्लक्ष्य करून लिहिलेलें दिसतें, त्याचें कारण असें आहे कीं, त्यावेळेस मला विलक्षण डोकें दुखण्याची व्यथा होती. या व्यथेपासून पुढें मला फारच त्रास झाला. प्रत्येक पांच दिवसांनीं पाळी येऊन ती ६ पासून सोळा तासपर्यंत राही. व मला काम करणें तें कपाळास थंड पाण्याची पट्टी बांधून करावें लागे. जसजसें कपाळ दुखणें बंद होई तसतसें माझे हातून पुष्कळ व उत्कृष्ट काम होई. ह्मणून असे प्रसंगीं मी केव्हां केव्हां दुसरे दिवशीं रात्रीं पावेतों झोंप न घेतां लिहीत असे. तेव्हां अर्थातच मला अजारी पडून घरीं (विलायतेस) पळावें लागलें. जें मीं काम हातीं घेतलें होतें तें शेवटास नेण्यास मला शक्ति व उत्साह येण्यास बरेच दिवस लागले. सरतेशेवटीं ग्रंथ संपवून तो हस्तलिखित मीं मरे साहेब यांजकडे पाठविला. त्यांनीं तो परिक्षेकरितां ज्याकडे पाठविला त्याणें तो वाचून मान्य केला. पुढें मी "अलबर मारली स्ट्रीट" त्या नांवाचे आळींत राहणारा जसा कांहीं सरदारच असा जो पूर्वोक्त मरेसाहेब त्यांचे भेटीस गेलों. त्यानें मला सांगितलें कीं,जर तुह्मी ग्रंथाचें नांव बदलाल तर आह्मी छापूं. मीं म्हटलें कीं,हा ग्रंथ मराठ्यांची बखर आहे आणि 'मराठ्यांची बखर' हेंच नांव यास योग्य आहे. तो म्हणाला तें खरें; परंतु म्हराठ्यांची यत्किंचित् माहिती तरी कोणास आहे ! त्यास मी उत्तर दिलें 'हें पुस्तक [illegible]ण्याचें कारण काय तें तेंच' 'मराठ्यांची माहिती 'लोकां फारच थोडी आहे !' मरेनें उत्तर केलें ' ठीक; परंतु माहिती असावी अशी तरी कोणास इच्छा आहे ' ! तुम्ही या ग्रंथाचें नांव ' मोगल लोकांचा पाडाव किंवा इंग्रज लोकांचा उत्कर्ष ' असें ठेवल्यास तें ठीक होईल. परंतु 'मराठ्यांची बखर' ! छे, हें पुस्तक कोणी विकत घेणार नाहीं. हें जें तो म्हणाला, तें जरी सत्य आहे असें मला पक्कें वाटत होतें तरी त्याच्या बोलण्यानें माझी हिम्मत खचली नाहीं. ***.

पुढें मीं ती माझे पुस्तकांची नक्कल " सर जेम्स माकिंनटाश " यांचे पुढें ठेवली. ते ती सर्व वाचण्याचे अधीच मोठ्या ममतेनें पायीं ( कारण त्यांवेळीं जनरथ नव्हते ) " क्याडोगान " हून " पाटर नास्टर " येथें गेले. त्यांच्या शिफारसी वरून " लांगमान आणि कम्पनी " या मंडळीनें आह्मी पुस्तक छापितों म्हणून मला लागलीच पत्र लिहिलें. मयत ' रीस ' साहेब या मंडळीचे भागीदार यांच्याशीं मीं बहुधा पत्रव्यहार ठेविला होता. जितके त्या वेळीं लंडन शहरामध्यें पुस्तकें छापण्याचें पतकरीत असत, त्यांत आपले कामांत यांचे सारिखा वाकबगार दुसरा कोणी नव्हता. किती पुस्तकें खपतील याचा अजमास करितांना हिंदुस्थानचे नांवावर यानें फार थोड्या प्रति घातल्या ह्मणून मला आश्चर्य वाटलें. त्याचें त्यानें कारण असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांत लोक ग्रंथ विकत घेत नाहींत. ते वाचतात; परंतु ते पुस्तकें लोकांजवळून मागून घेतात. आणि परदेशीं जातांना हें पुस्तक बरोबर घेण्यास योग्य आहे अशी खातरी होण्यास बरेच दिवस लागतील. मग जें बोलला तें खरें; कांहीं तरी पूर्वीं थोडी माहिती असल्याशिवाय जास्ती माहिती करून घेण्याची इच्छा कोणास होत नाहीं. नफ्या तोट्याचे मालक छापणारे झाले. तो ग्रंथ पूर्ण होऊन छापण्यास व तयार होण्यास मला २० हजार रुपयांवर खर्च लागला. कोर्ट आफ् डायरेक्टर या सभासदांनीं त्याच्या ४० प्रति घेतल्या. मराठी शब्दसंग्रहाच्या देखील त्यांनीं इतक्याच प्रति घेतल्या असत्या. एकंदरींत ह्मटलें तर हें उदारपणाचें कृत्य झालें; परंतु मीं जरी हे खरोखर सरकारास उपयोगी लेख मिळविले, व एक केवळ स्वकपोलकल्पित आणि मोठा उपयोगी असा नकाशा रचून दिला, तरी मीं हा त्यांस पाठविला त्याचें त्यांनीं मला पावल्याचें उत्तर सुद्धां दिलें नाहीं. त्यांनीं कधींही मला पुसलें नाहीं,

व मींही सांगितलें नाहीं; कीं हा जो मीं खटाटोप केला त्यांत मी, १७,००० रुपयांपेक्षां जास्ती रुपयांस बुडालों.*"

या पत्रावरून कांहीं विचार मनांत येतात; ते लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ग्रांट साहेबांनीं इतका श्रम करून व इतका पैसा खर्च करून जे लेख मिळविले ते आतां कोठें आहेत? या पत्रावरून आह्मास त्या लेखांविषयीं कांहीं हकीकत कळत नाहीं. ते कां चोरीस गेले, किंवा 'न्यूटनचे' कित्येक कागदांप्रमाणें कुत्र्यानें जाळले, किंवा जाणून बुजून 'आलेग्झांड्रिया येथील पुस्तकांची "खऱ्या धार्मिक" लोकांनीं जी दशा केली असें मानिलें आहे तशी कांहीं झाली, याचें अनुमान होत नाहीं. कित्येक वृद्ध दप्तरांतील वाकबगार कार्कुनांचें असें ह्मणणें आहे कीं, या कागदांची जाणून बुजून होळी केली. या ह्मणण्यास दस्तऐवजी कांहीं कोणापाशीं लेख नाहीं. परंतु आमचे एक हुशार मित्र † असें ह्मणतात कीं, या संबंधीं ग्रांट साहेबांचे व "दक्षिणेचे कमिशनर" साहेबांचे कांहीं लेख त्यांनीं पाहिले आहेत. त्यावरून या कागदांचा जाणून बुजून नाश केला असें मानण्यास हरकत नाहीं. अशा दोन विद्वान पुरुषांनीं असें अनुचित कर्म केलें असेल अशी कल्पना करणें मनास आवडत नाहीं. परंतु ज्या अर्थीं सर्व हिंदुस्थानभर ठेवणाईत ठेवून इतिहासाचीं साधनें मिळविलीं, त्यांतून जर आतां म्हणण्यासारिखें कांहीं एके ठिकाणीं मिळत नाहीं तर तीं कोठें गेलीं? ह्या शंकेचें समाधान होत नाहीं. ह्मणून ही जी दंतकथा आहे ती सांगणें आम्हास भाग पडलें. ही येथें सांगितली त्यावरून आह्मी ग्रांट

या पत्रावरून सुचणाऱ्या गोष्टी व आतां नवीन इतिहासकारास काय साधनें मिळतील, यांविषयीं.

* हें पत्र आह्मीं "बांबे सॉटरडे रिव्ह्यू" तून घेतलें.

† रा. रा. कै० दाजीसाहेब सरंजामे. हे इनाम कमेटींत कांहीं दिवस नौकर होते.

साहेबांची जी स्तुति केली, तिचें आमचें आह्मीच खंडन केलें, असें कोणी समजूं नये. परंतु श्रोत्यांनीं असें समजावें कीं, एखाद्या गोष्टीचा पक्का निर्णय होत नाहीं, व अपराध कोणाचे पदरीं बांधतां येत नाहीं, अशा प्रसंगीं मोठ्या विचारानें वागावें लागतें. व सांप्रत प्रसंगीं आरोपित साहेब कैलासवासी झाले आहेत. ह्मणून त्यांचें दोषविमोचन त्यांचे हातून होणें अशक्य, ह्याकरितां त्यास उगेच दोषी असें आह्मी म्हटलें नाहीं. मराठ्यांची नवीन स्वबुद्धीनें बखर करणारांस काय काय साधनें मिळतील, या गोष्टीचे निरूपणांत विशेष साधनें मिळणें अशक्यसें दिसतें हें सांगण्यास त्यांस प्रतिकूल अशी जी ही दंतकथा ती सांगणें इष्ट दिसलें. यांत साहेबास दोषी ठरवावें व त्यांची विटंबना करावी असा आमचा बिलकुल हेतु नाहीं. यांत जर कांहीं पेशव्यांचे दफ्तरांतील लेखांचा खरोखरच नाश झाला असेल तर त्या लेखांच्या नकला आतां कोठें मिळतील अशी आशा करणें नको. ज्या देशांत पुस्तकें छापण्याची कला नसल्ये, तेथें ग्रंथांची न्यूनता व वाचकांची न्यूनता किती असल्ये, ती या निबंधाचे श्रोत्यांस सांगावी असें नाहीं. त्यांस अशा मूळ लेखांची तर आमचे मुलखांत फारच न्यूनता. कोणी राजाश्रित किंवा दरबारचे अखबारनिस हे नादानें कांहीं हकीकती, प्रकर्णें व बखरा लिहून ठेवीत असत. परंतु ग्रांट साहेबास कित्येक असे लेख मिळाले असतील कीं, त्यांची प्रत त्यांस मिळाली तेवढीच कदाचित् असेल. व ती आतां सर्व हिंदुस्थानांत कोठेंही मिळणार नाहीं. ज्याअर्थीं आह्मीं लेखांच्या लयाची मानलेली गोष्ट सांगितली त्याअर्थीं त्याचें मूळ कारण काय, किंवा लोक याचें कारण काय सांगतात, तेंही सांगतों. आमच्या देशबांधवांनीं कित्येक लहान लहान कामांत व कित्येक मोठमोठ्या लढायांत अशीं शूरत्वाचीं कृत्यें केलीं कीं, तीं 'कद्धर' व त्याचे अनुयायी यांसही शोभावीं. त्यांचे आ-

ठवणीनें लोकांत उगीच आपल्या पूर्वसत्तेविषयीं गर्व, व त्या गर्वाचें सहचारी जे परराज्यसत्ताशत्रुत्वतें राहूं नये म्हणून हे लेख जाळिले असें महाराष्ट्र देशांतील पुष्कळ गृहस्थांचें मत आहे. यांत खरोखर ‘ मेलेल्या म्हशीस० हंडाभर दूध ’ असेंही कांहीं झालें असेल, यांत संशय नाहीं. * हें काय असेल तें असो; परंतु अजूनही क्षुल्लक कारणांकरितां सरकारी लेख जाळण्याची जी सुरुवात आहे, तिच्यापासून ही वरील प्रकारची दंतकथा निघूं शकते. शिवाय असलें कृत्य हें एकुणिसावे शतकास व इंग्रजासारखे विद्वान लोकांस युक्त नव्हे. जे हे लेख नष्ट करितात ते म्हणतात कीं, ज्या लेखांत कांहीं हंशील नाहीं, जे पोरकट, व निरुपयोगी, ते मात्र आम्ही नष्ट करितों. परंतु जे लेख या अधिकाऱ्यांशिवाय दुसऱ्या कोणाचे दृष्टीस पडत नाहींत, ते त्यांच्या सांगितल्याप्रमाणेंच असतील असें कशावरून म्हणावें ? व जरी कित्येक लेखांत बादशाहाच्या गोष्टी, चाळीस हजार पायदळ, साठ हजार स्वार व हजार तोफा इत्यादि प्रकरणांविषयीं कांहीं जरी नसलें, तरी ते लेख नष्ट करण्यास योग्य, असें आम्ही क्षणभर सुद्धां प्रतिपादन करूं देणार नाहीं. येथें या विषयाचें प्रतिपादन करणें म्हणजे साधारण गोष्टीचें प्रतिपादन केल्यासारिखें होतें. म्हणून आम्ही जास्ती लिहीत नाहीं. कित्येक बखरी क्वचित् कोणाकोणाजवळ सांपडतात. “ शिवाजी महाराजाची बखर,” इत्यादि ज्या हस्तलिखित बखरींचीं नांवें वर सांगितलीं त्या बखरी कित्येकांनीं पाहिल्या असतील. व अल्प पैशानें हातीं लागण्या सारिख्याही आहेत. केवळ मराठ्यांनीं जे ग्रंथ केले त्यांत या ग्रंथांची गणना करणें योग्य आहे, म्हणून त्यांचे गुणावगुणांविषयीं दोन शब्द बोललों असतां अप्रयोजक होतील असें वाटत नाहीं.

---

*परिशिष्ट २ रें पाहा.

उत्तम इतिहास कसा असावा किंवा उत्तम इतिहास कोणता याविषयीं मतभेद आहे. यांतील एका मताचें असें ह्मणणें आहे कीं, इतिहासकारानें आपला अभिप्राय म्हणून देऊंच नये, जें काय झालें तें इत्थंभूत सांगितलें ह्मणजे झालें. हें मत ज्यांस मान्य असेल अशा वाचकांस आमच्या मराठी बखरी वाचून पूर्ण आनंद होईल. त्यांची बारीक बारीक हकीकत सांगण्याची शर्थ आहे. डेरा कोठें दिला, बसावयास कोणी घातलें, पानसुपारी कोणी वांटली, त्यांचीं नांवेंहीं पण दिलेलीं असतात. परंतु गोष्टींचे प्रथमतः ग्रंथकर्त्यानें मनन करून व वाटन करून कांहीं विशेष कल्पकपणा दाखविला आहे अशीं उदाहरणें थोडीं सांपडतील या ग्रंथांची भाषा शुकबहात्तरी, वेताळपंचविशी, विक्रमबत्तिशी, इत्यादि ग्रंथांप्रमाणेंच आहे. वाक्यें अतिशय लहान असतात. व "कीं" च्या ठिकाणीं बहुधा "जे" लिहिलेलें असतें. हा पाठ अजूनही पत्रव्यवहारांत आहे. ( आपली "विज्ञापना ऐसीजे" सर्वांस माहित आहेच ). या लहान वाक्यांच्या योगानें कोठें कोठें अवाचित् भाषा उद्दाम होत्ये.

बखरींचें वर्णन.

या शिवाय आणखी किती एक न्यूनता या लेखांत आहेत. हे ग्रंथ बहुशः कारकुनी बाणा बाळगणाऱ्या ह्मणजे साधारण कारकुनांस जितकें ज्ञान असावें तितकें ज्ञान असणाऱ्या लोकांनीं लिहिले आहेत; ह्मणून त्यांची भाषा व्याकरणरहित व फारशी शब्द मिश्रित असते; व भलतेंच ठिकाणीं जमाखर्ची डौल मिरविलेला त्यांत आढळतो. आमच्यास पांच मुलें होतीं असें सांगणें असल्यास "बितपशील" ह्मणून खालीं मुलांचीं नांवें जमाखर्चासारख्या सदरांत घालून एक आंळ ज्यास्त लिहून प्रसंगी तेथें "लग" असा शब्द लिहिलेला असतो. याच प्रमाणें सैन्यांच्या याद्दी, मालांच्या झडत्या, कोटकुर्ग यांचीं नांवें, बहुधा जमाखर्ची

तोरावर दिलेली असतात. " हरिभक्तिपरायण " हेमाडपंत यांणीं जो शीक्षाक्रम आपल्या नीतींत सांगितला आहे त्या क्रमास अनुसरून शिकलेल्या लोकांनीं या बखरी लिहिलेल्या आहेत. तेव्हां त्यांस एक रीत्या " हेमाडपंती " हें नांव दिल्यास अयोग्य होणार नाहीं. वाक्यें यांत बहुधा लहानलहान असतात, असें वर ह्मटलें आहे; परंतु कित्येक ठिकाणीं वाक्यें इतकीं लांब व असंबद्ध असतात, कीं त्यांस कोणतेंही प्रकारचें व्याकरणाचे आळें घालूं म्हटल्यास तसें होऊं शकत नाहीं. एकदां लिहिणाराची लेखणी घसरली कीं तीस सावरण्याचा उपायच नसतो. बखरांतील वाक्यें जीं बहुधा लांब असतात तीं बहुशः व्याकरणरहित असतात. तशीं जर नसतीं तर आह्मीं त्यांस दूषण मुळींच दिलें नसतें. या शिवाय वाक्यांमध्यें कार्य कारण भाव नसतो, किंवा विपरीत असतो असें ह्मटलें पाहिजे. उदाहरणार्थ " संभाजी महाराज दिलेल खानाकडून अलियावरी शिवाजी महाराज यांणीं बोध करून पनाळीयावरी रहावें असा निश्चयकरून तेथें ठेविले. यास कारभारी विठ्ठल त्रिंबक महाडकर देशपांडे बाजी मुरार यांचे नातू हे खासनिशी करून देऊन पनाळी यावरी महाराजांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून राहिले". या वाक्यांत " देऊन " याचा संबंध महाराजांकडेस आणि " राहिले " याचा संबंध देशपांडे याच्याकडे आहे. याप्रमाणें ऊन प्रत्ययांत अव्ययय असल्यास कार्य कारणाचा संबंध लिहिणारांचे मनांत वागत नाहीं. बहुधा जे जुने मराठी लेख आह्मी पाहिले आहेत त्यांतही चूक आढळतेच. फारसी उर्दु भाषेंत असे असंबद्ध प्रयोग वारंवार नजरेस येतात; तेव्हां ही सड आमचे कारकुन मंडळीनें मुसलमान ग्रंथकारापासून घेतली असावी. तसेंच स्वकीय लोकांस ' गलीम ' किंवा ' गनीम ' ह्मणजे लुटारू असें जें बखरींत ह्मटलेलें असतें तेंही फारसी ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरून

असतें. कदाचित् मुसलमानी तरवारीख, ह्मणजे इतिहास, यांच्या आधारानें ही आमच्या बखरी क्वचित् लिहिलेल्या असतात, असाही संशय यांरूवन उत्पन्न होतो. मराठी कवितेमध्यें ज्याप्रामाणें स्त्रिलिंगीं तृतिय पुरुषीं सर्व नामाचें ठिकाणीं तृतिय पुरुषीं नपुंसकलिंगीं सर्व नाम योजिलें असतें त्याप्रमाणें यालेखांतही पुष्कळ ठिकाणीं असते. बहुत ठिकाणीं तृतीयांत कर्ता ईकारान्त आढळतो.

हिंदूलोकांत ज्यास इतिहास ह्मणावें असे ग्रंथ नाहींत. असें ह्मटल्यासही चालेल. कल्हणकृत "राज तरंगिणि" नामक काश्मीर देशाचा वृत्तांत मात्र इतिहासाच्या तऱ्हेवर कवितेंत लिहिला आहे. आमचे ऐकण्यांत "कालिंदी महात्म्य, ह्मणून दिल्लीकडील राजांचा इतिहास संस्कृत भाषाबद्ध आहे; परंतु तो उपलब्ध नाहीं. तथापि या प्रकारच्या ग्रंथांस इतिहास ही संज्ञा देतां येत नाहीं; कारण यांचे कर्ते कवि होते, व त्यांचें लक्ष्य इतिहास लिहिण्यापेक्षां आपलें कवित्व प्रकट करण्याकडेस ज्यास्त होतें. पुराणें हीं आमच्यांत एका प्रकारें इतिहास मानिलीं आहेत. यापुढें मुसलमानांनीं लिहिलेल्या तवारिख, ह्मणजे इतिहास, यांचा आमचे लोकांस परिचय झाला. या दोन्ही प्रकारच्या इतिहासांचे व कारकुनी बाण्याचे मासले मराठी बखरांत सांपडतात. ज्याप्रमाणें पुराणांचे आरंभीं विवक्षित कथा कोणी एकत्रऽपि नैमिष अरण्यांत अथवा अशाच एकादे पवित्र स्थळीं मिळालेल्या ऋषींस अथवा कोणें एकादे राजास सांगत आहे असें वर्णन केलें असतें, तसेंच कित्येक बखरांत लिहिलेलें असतें. व ज्याप्रमाणें पुराणांत क्वचित् स्थळीं पुराणांची कथा सांगणारे मुनि मध्येंच अल्प स्वल्प आपल्या तर्फेचीं वाक्यें घालतात व तेणें करून कोण कोणास ही कथा सांगत आहे त्याची वाचकांस स्मृति होत्ये, तोच प्रकार आमचे बखरांत क्वचित् आहे.

कित्येक बखरी सातारकर भोसल्यांच्या वंशांतील कित्येक राजांच्या हुकुमावरून त्यांच्या पदरच्या लोकांनीं पूर्वीचे कागद पत्रावरून लिहिल्या आहेत. अशा बखरा विश्वसनीय जास्त आहेत हें सांगणेंच नको. कित्येक बखरांत महाराष्ट्र लोकांविषयीं मुसलमान ग्रंथकारांनीं लिहिलेलाच मजकूर जमेस धरून पाल्हाळ केलेला असतो. अशा प्रकारच्या बखरा बहुधा फारसी लेखांवरून उतरल्या असाव्या असा संशय येतो, व त्याविश्वासार्ह नाहींत. कित्येक बखरांत त्या कोणी व कशा केल्या, यापर्यी आरंभीं कांहीं वृत्तांत लिहिला नसून साधारण "राजमान्य राजेश्री" हा प्रसिद्ध पत्राचा मायना आरंभीं लिहिला असून फलाण्यानें फलाण्याच्या लिहिण्यावरून फलाण्यास ही बखर पाठवून दिली आहे इतकेंच लिहिलेलें असतें. आमचे गांवठी शाळांतील मुलें अक्षर घटावें ह्मणून बखरांच्या नकला करितात. व कारकुनांचें काम मिळावें या पेक्षां दुसरा त्यांचा उद्देश नसतो. त्यांस साधारण पत्रें लिहितां यावीं ह्मणूनच असे मायने दिलेले असतात. या ग्रंथांविषयीं शेवटीं इतकेंच सांगतों कीं, ते कोणी साद्यंत मिळवून, व जागोजागीं पूर्णविराम करून छापिल्यास त्यांचा पुष्कळ उपयोग होईल.

या शिवाय कांहीं विशेष माहिती संस्थानी लोकांचे येथें मिळेल अशी आशा आहे. व आलीकडे इंग्रजींत जातीविषयीं जी माहिती व नवे तर्क निघाले आहेत; त्यांच्या सहायानें व पुढें ज्या न्यूनता ग्रांट साहेबांचे ग्रंथांत आह्मीं दाखविल्या आहेत, त्यांचे पूर्णतेनें नवीन ग्रंथास बरीच मदत मिळेल, अशी उमेद धरणें योग्य आहे. ग्रांट साहेबांचे ग्रंथांत देखील कांहीं मागचें पुढें व पुढचें मागें; कित्येक गोष्टी अगदींच गाळून टाकणें व कित्येक गोष्टींचा विस्तार करणें, इत्यादि गोष्टी केल्यास बरीच सुधारणा होण्यास जागा आहे.

हा विषय लोकांस कां आवडूं नये, व पुष्कळांनीं इकडे लक्ष्य कां पुरवूं नये? हें आम्हांस कळत नाहीं.

हा विषय मनोरंजक व महत्वाचा आहे.

हा विषय मनोरंजक नाहीं; किंवा महत्वाचा नाहीं, असें आम्हांस वाटत नाहीं, किंवा या विषयांत उलाढाली थोडक्या आहेत. असें हीं नाहीं. जो ग्रंथकार मराठ्यांचे बखरीचें विवेचन करील, त्यास राज्यांच्या घडामोडी तर काय, परंतु बादशाही साम्राज्यांच्या घडामोडीचें विवेचन करावें लागतें. प्रथमतः वाचकांस बादशाही दरबारांत नेऊन तेथील चमत्कार दाखवावा लागतो. तेथील दरबाराचा थाटमाट व राज्यांतील अंदाधुंदी हीं एकदांच दाखवावी लागतात. राजा बळहीन, दरबारांत वैमनस्यें, बादशाही जनानखाना, आणि नायकिणीचा वाडा, व या सर्वांचे लपंडाव, तोंडानें बादशाहाचे आह्मी दासानुदास ह्मणत असतां यजमानाचा अधिकार चालविणारें चाकर लोक, इत्यादि सर्व गोष्टी, वाचकांस दाखवाव्या लागतात; व मध्यें या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून सुचलेले गहन विचार सांगावे लागतात. मग त्या वाचणारांस असल्या ऐष आरामांतून व थाटमाटांतून काढून, त्यांस एक लंगोटी घालून, व डोईस मुंडासें व कामळें अशा थाटानें शिवाजीच्या संगतीबरोबर मावळे लोकांचा जमाव देऊन रानावनांतून, गिरिपर्वतांवरून आज गुजराथेंत, उद्यां कर्नाटकांत, असें हिंडवावें लागतें. पुढें ज्यांस लंगोटी, मुंडासें व कामळें यांशिवाय दुसरें प्रावर्ण माहीत नाहीं, अशांसच मोठमोठाले सरदार करून, त्यांच्या दरबारांतील चमत्कारिक वेन व अलौकिक शिपाइगिरी दाखवावी लागते. यानंतर पायांत पाटलोन व डोक्यास टोपी असे "ताम्रमुखी" व्यापाराकरितां देशांत आणावे लागतात. त्यांची देशी राज्यांत हळूहळू, प्रवेश करण्याची रीति, व केवळ परोपकाराकरितां असें दाखवीत असतां, आपला स्वार्थ साधण्याची शैली, आज

याचा पक्ष, उद्यां त्याचा पक्ष घेणें, मोठ्या राज्यांतील सरदारांस स्वातंत्र्य देऊन आपले मित्र करणें इत्यादि सर्व खुब्या दाखवून, यांच्या या अद्वितिय राज्यनिपुणतेनें या व्यापाऱ्यांस सार्वभौमत्व प्राप्त झालेलेंहीं दाखवावें लागते. हें कृत्य झाल्यावर आतां रयतेस काय सुख झालें यांचाही विचार करावा लागतो. हें जें कथेचें सूत्र आम्ही दाखविलें यावरून हा विषय मोठा समर्पक व मनोरंजक असा आहे हें सर्वांस स्पष्ट कळेल.

महाराष्ट्र देशासंबंधीं पुराणांतील प्राचीन माहिती.

महाराष्ट्राचें नांव पुराणांमध्यें अगदींच निघत नाहीं असें नाहीं. या देशांत सीतेच्या स्नानानें परिपूत झालेले निर्झर वहात आहेत. व रामायणांत ज्या ऋषींचीं नांवें सांपडतात त्यांतील कित्येक परम विख्यात ऋषींचे आश्रमही याच देशांत होते.*पुराणांत अशी दंतकथा आहे कीं, हा देश ( ज्यास पूर्वीं दंडकारण्य असें ह्मणत असत ) रावणाचें राज्याखालीं होता; व त्यानें आपल्या घडशास ह्मणजे वाजंत्र्यांस तो बक्षीस दिला होता असेंही आहे. हें वर लिहिलें याचे प्रसंगानें हें ह्मणण्यास मूळ भूत जो रामायण ग्रंथ, याविषयीं सांप्रत विद्वानांचें जें मत आहे व त्या मतास दृढ करणारीं जीं कारणें आहेत, तीं सर्व येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; परंतु इतकेंच सांगतों कीं, रामायणांतील मूळ कथा खचित घडली असावी, व राक्षस ह्मणून ज्यांस ह्मटलें आहे, तें कोणी तरी शरीरानें धिप्पाड अथवा कुरूप व क्रूर जातीचे लोक असावें, व रामानें वानरांची सेना केली, यांतील तात्पर्य रामानें रानठी लोकांची एक सेना केली असें असावें असें बहुतांचें मत आहे. याविषयीं जास्त माहितीची ज्यास अपेक्षा असेल त्यानें ती अन्य ग्रंथातून वाचली पाहिजे. या गोष्टीचा शक कोणता होता हें माहीत नाहीं. याविषयीं शुष्क तर्क फार आहेत.

---

* परिशिष्ट ४ थें पहा.

देशांतील लोकांचें वर्णन

या देशांत पूर्वी ब्राह्मण लोक अगदी नव्हते. ब्राम्हण लोक यांचे पूर्वज जे आर्य लोक यांनीं प्रथम पंजाबांत वस्ती केली; पुढें ज्या "ठिकाणीं काळ्या पाठीचा हरीण सांपडेल" त्या ठिकाणीं ब्राह्मणास वस्ती करण्यास हरकत नाहीं अशी आज्ञा झाली. यापुढें महाराष्ट्र देश त्यांचे वसाहतीस योग्य झाला. या गोष्टीच्या शकाचें कांहीं अनुमान करितां येत नाहीं. आर्य लोकांचे वसाहतीपूर्वीं या देशांत सिथियन लोक असत असें अनुमान होतें; कारण आमचे भाषेंत सिथियन भाषेंतील शब्द बरेच येतात व आमच्या धर्मांत सिथियन देवताही पुष्कळ आल्या आहेत. म्हसोबा, बहिरोबा, सटवाई, यल्लमा, शिव इत्यादि देवतांविषयीं वेदांत एक अक्षर सुद्धां नाहीं. शिवाशिवाय यांचीं नांवें पुराणांतसुद्धां निघत नाहींत. वेदामध्यें रुद्र या देवतेचें एक दोन ठिकाणीं नांव येतें; परंतु रुद्र आणि शिव एक नव्हत असें वेद जाणणाऱ्या विद्वान युरोपियनांचें मत आहे. सिथियन लोक ह्या देशांत केव्हां आले याचा निर्णय करितां येत नाहीं. या देशांतील मूळचे राहणारे लोक महार असावेत असा एक न साजण्यासारिखा तर्क केला आहे. असो यावरून या देशांतील वस्ती मिश्र आहे हें उघड दिसतें. मराठे म्हणजे महाराष्ट्रांतील कुणबी, हे तरी कोण याविषयींही उलख नाहीं.* कित्येक ग्रंथकारांनीं यांस महाराष्ट्र देशांतील मूळ रहिवाशी असें मानिलें आहे. व त्यांनीं पौराणिक धर्म स्वीकारिला असेंही मानिलें आहे. खोंड, भिल्ल,' व रामोशी यांचीही मूळ रहिवाशांत गणना केली आहे. या लोकांशीं व मराठे लोकांशीं तुलना केली असतां साम्याच्या कांहीं गोष्टी दिसून येतील. बहुधा साधारण ठेंगणी भूई, शरीराचा मजबूत बांधा, चापल्य, शरीराचे मानानें बलाचें आधिक्य,

* परिशिष्ट ५वें पहा.

व राकटपणा इत्यादि गुणसाम्य झटल्यास चालेल. तसेंच कांहीं लग्नसंबंधीं विधिही सारखे आहेत. मुलीस तिच्यां पक्षाच्या लोकांनीं पळवून नेणें, तीस तिचे नवऱ्यानें पुनः शोधून काढणें,व झेंडा नाचवणें इत्यादि गोष्टी उभयपक्षीं साधारण आहेत; परंतु या सहवासानें मराठ्यांमध्यें आल्या नसतील असेंही ह्मणवणार नाहीं.आर्य लोकांचे जे'शूद्र'तेच हे मराठे असें ही मानिलें आहे.पुढें जसें मराठे विख्यात होऊं लागले तसें ते आपणास क्षत्रिय ह्मणवूं लागले. व त्यांच्या कित्येक कुळ्याही जमतात; व कांहीं दिवस वेदोक्त कर्म करण्याचाही अधिकार त्यांनीं भोगिला. असो, यावरून यांच्या मूळ उत्पत्तीविषयीं फार घोटाळा आहे हें उघड दिसून येईल.

या प्रकरणाचा निर्णय करण्यास साधनें फार थोडीं आहेत; व याचा निर्णय असल्या लहानशा निबंधात होणें कठीण; परंतु याविषयीं डफ् साहेबांचे ग्रंथांत ह्मणण्यासारखें कांहीं लिहिलें नाहीं हें सांगणें अवश्य आहे.

या देशांत मुसलमानचा प्रवेश. सन १२००

या वर्षाचे सुमारास मुसलमानांनीं देवगड किल्ला घेतला. व तेथून त्यांची दक्षिणेंत प्रबलता झाली. या मुसलमानी राज्यांची हकीकत सांगणें हें कांहींसें विषयांतर आहे. येथें या विषयावर फिरिस्ता या नांवाचे फारसी ग्रंथांत पुष्कळ सांपडतें, व त्यांतून रेवरेंड बाबापद्मजी यांनीं जें लहानसें परंतु सुरस असें नवीन महाराष्ट्र देशाचें वर्णन केलें आहे. त्यांतही थोडेंसें घेतलें आहे. डफ् साहेबांसही पारशीं ग्रंथ या संबंधाचे पुष्कळ मिळाले होते त्यांचा त्यांनीं बराच उपयोग केला आहे. फिरिस्ताच्या ग्रंथाचें इंग्रेजींतही भाषांतर झालें आहे. संक्षेपार्थ कांहीं प्रकरणें टाकून एकदम मराठे प्रबल होऊं लागले त्याचें वर्णनास आह्मी येथें आरंभ करितों.

१४ वे शतकापासून मराठ्यांची माहिती विशेष कळूं ला-

मराठ्यांचे वर्णन.

गते. या वेळेस त्यांस मराठे असें नांव नव्हतें. मुसलमान लोक त्यांस केवळ हलकट असे समजून "बरगे" ह्मणजे बारभाई असें ह्मणत. हे बरगे पहिल्यापासून लढाई करण्यांत मोठे दक्ष व भांडखोर असत. कोणाचाहीं पक्ष स्वीकारिला ह्मणजे आपल्या जातींतल्यांशीं देखील लढाई करीत, व भाऊबंदकीचा किंवा बापलेकांचा तंटा झाल्यास एकमेकांचा प्राण घेण्यास सोडीत नसत. हे बहुधा घोड्यावर बसून लढाई करीत; व त्यांचा उत्कर्ष होण्यास दक्षिणेंतील घोडा फार उपयोगी पडला. या घोड्याची अवलाद आरबी घोडा व काटियावाडी घोडी यांपासून झाली आहे असें ह्मणतात.* हे घोडे शरीरानें फार मोठे नसून महाराष्ट्र देशांतील जमिनीसारख्या खडकाळ जमिनीवर चालण्यास, व कष्ट काढण्यास, व जलदीचें काम करण्यास फार चांगले. क्वचित् मस्ती करणें हा मात्र यांचा दुर्गुण.

या प्रकारच्या घोडेस्वारांनीं चवदावें शतकांत कर्नाटक प्रांतांत बंड केलें, तें बंड मुसलमानांस एक वर्ष मोडवलें नाहीं. हे बरगे लढाईच्या कामांत कुशल व हुशार म्हणून मुसलमान लोक यांस, आपली लोकसंख्या कमी म्हणून निरूपायानें, प्रथम चाकरीस ठेवूं लागले. या चाकरीमध्यें पुष्कळ मानास चढले, त्यांतून कित्येक पांच व दहा हजार अशा स्वारांचे मनसबदार झाले. याच एका कुळांत सोळावें शतकांत महाविख्यात जो शिवाजी तो जन्मला. शिवाजीचा बाप शहाजी याचें जसें वर्णन असावें तसें ग्रांट साहेबाचे ग्रंथांत नाहीं. शहाजी मराठ्यांमध्यें साधारण पुरूष झाला असें नाहीं. रामाच्या कीर्तीमुळें जशी दशरथाची कीर्ती मागें पडली व सर्वतो मुखीं रामराम शब्द निघत असून दशरथाचें नांव कोणी फारसें घेत नाहीं, तसें शहाजीचें त्याच्या पुत्राचें-

* या ह्मणण्यास लोकांचे ह्मणण्या शिवाय दुसरा आधार नाहीं.

कीर्तीमुळें नांव मागें पडल्यासारखें झालें आहे. मराठ्यांमध्यें शिवाजीच्या पूर्वी झालेल्या धेडांत शहाजीच्या बरोबरीचा पुरुष नामांकित कोणी निपजला नाहीं. दक्षिणेंतील पांचही मुसलमानी पादशाहती सर्व शहाजीनें हालवून सोडिल्या होत्या. कित्येकांत तो नांवाचा वजीर असून केवळ पादशाहाचा अम्मल पूर्ण रीतीनें स्वतः चालवीत होता. तेव्हांच्या त्यांच्या स्थित्यनुसार त्यास केव्हां केव्हां पक्ष बदलणें भाग पडत होतें. तरी कोणचाही पक्ष सोडणें तें आपली तो राखण्याविषयींची कमाल केल्याशिवाय तो सोडीत नसे. यामुळें तो जिकडे जाई त्या पक्षाचे लोकांस आपणास हा मोठा लाभ झाला असें वाटून ते त्याचा मोठा मान व इज्जत राखीत. प्रसंगानुसार दिल्लीच्या मोगलांसीही यानें दोन हात केलेले होते. तेव्हां शिवाजीच्या पूर्वीच मराठ्यांस हें शिक्षण शहाजी पासून मिळालें होतें.

ईश्वरी सूत्र कांहीं विलक्षण असतें. ज्या देशांत एक नव्हे परंतु पांच मुसलमानीं राज्यें स्थापित झालीं होतीं, ज्यांत देशी राजांचें बहुदां निर्मूलन झालें होतें, त्याच देशांतून मुसलमानी राज्य बुडविणारा शककर्ता उत्पन्न व्हावा, ही गोष्ट ज्याच्या कृपेनें पंगु गीरींचेंही लंघन करूं शकतात त्याच्या अनुग्रहावांचून कशी झाली असेल ? मारणारापेक्षां तारणारा मोठा असतो हें सर्व मारणारे जुलम्यांनीं लक्ष्यांत वागवून तारण्याकडेसच विशेष लक्ष्य द्यावें, ह्मणजे ईश्वर कृपेनें दोघांचेंही हित होतें. मराठी बखराकारांचें याविषयीं असें ह्मणणें आहे कीं, दक्षिणेंत सर्वत्र यवनी झाली. हिंदुस्थानांत उदेपूर, जोधपूर, जयपूर, इत्यादि हिंदूंची स्थानें राक्षिलीं होतीं त्यामुळें हिंदु लोकांस त्यांचे धर्मास बसण्यास कांहीं छाया राहिली होती, ती दक्षिणेंत नसल्यामुळें सर्वत्र उन्हाळा झाल्याप्रमाणें होऊन या देशचे लोकांस जो ताप झाला तो असह्य झाला. तेणेंकरून ते केवळ वैतागल्यासारखे झाले.

शिवाय या मुसलमानी राज्यांत जेव्हां आपआपसांत युद्ध निघत तेव्हां त्यांस देशी लोकांची मदत घेणें भाग पडे ह्मणून ती निरूपायास्तव ते घेत. याचा मोबदला ते त्यांस द्यावा तसा देत नसत. ह्मणून दक्षिणेंतील लोकांचीं मनें, हिंदुस्थानांतील दिल्लीच्या पादशाहीकडे जशीं राजपुतांचीं रुजूं होतीं त्याप्रमाणें, कधीं यवनांस वश झालीं नव्हतीं. अकबराप्रमाणें कोणी दीर्घ दृष्टी पादशाह या मुलखांत झालाच नाहीं. या उणीवीचें फळ त्यांस भोगावें लागलें.

आतां शिवाजीनें ज्या लढाया मारिल्या,व जीं मोठमोठालीं कामें केलीं, आणि हे असे हलकट मानिलेले वरगे यांस पुढें जी मराठी बादशाहीची कीर्ति मिळाली, तिचा पाया कसा घातला, याविषयीं थोडीबहुत माहिती आबालवृद्धांस आहेच; ह्मणून ती येथें सांगण्याची जरूर नाहीं. ग्रांट डफ् साहेब यांनीं जें शिवाजीच्या वर्तणुकीवर आपलें मत दिलें आहे तें प्रायः मात्र आह्मांस मान्य आहे. मराठींत जी थोडीबहुत हस्तलिखित इतिहासांचीं पुस्तकें आहेत, त्यांत शिवाजी महाराजाच्या बखरी ह्मणून कित्येक बऱ्याच मोठ्या बखरी आहेत. त्यांत शिवाजी महाराजाविषयीं पुष्कळ माहिती सांपडते. व ग्रांट साहेबांनीं इतर ठिकाणाहूनही बरीच मिळविली असावी; कारण त्यांनीं शिवाजीविषयीं जें लिहिलें आहे तें सविस्तर लिहिलें आहे.

आमच्या मतें या प्रकरणांत ग्रांट डफ् साहेबांचे हातून एकच चुकी झाली आहे.ती ही कीं त्यानीं शिवाजीचें चरित्र लिहितानां मराठ्यांचे लेखांवर जितका भरोसा ठेवणें योग्य आहे तितका ठेविला नाहीं. इतकेंच नाहीं, पण आम्हास वाटतें कीं त्यालेखांवर जितकें लक्ष्य पुरविणें योग्य आहे तितकें लक्ष्यही त्यानीं पुरविलेलें नाहीं. कारण शिवाजीविषयीं जितका प्रतिकूल भाग त्यांचे लेखांत आला आहे तितका बहुतेक मुसलमान किंवा त्यांचे अनुयाई यांचें लिहिण्यावरूनच घेतलेला

आहे. मराठी बखराकारांचें ह्मणणें जमेस धरलेंच नाहीं. वास्तविक पहातां मराठी लिहिणारांस आपले राष्ट्राचा किंवा आपले राजांचा किंवा वीरपुरुषांचा कैवार घेऊन लिहिण्याची मुळींच संवय नाहीं. ह्मणून खऱ्याचें खोटें किंवा खोटयांचें खरें केल्याचीं उदाहरणें त्याचे लेखांत फारच विरळा सांपडतात. या लेखांत जे शिवाजीचें चारित्र लिहिलें आहे त्यावरून शिवाजी हिंदुलोकांचे शास्त्रांत सांगितल्या प्रमाणें वागणारा एक निसीम अति स्पष्ट क्षत्रिय होता याविषयींमुळींच संदेह रहात नाहीं. महाराष्ट्रांतील लोकही त्यास अद्यापि अवतारी पुरूष असें मोठ्या प्रीतीनें मानितात. तो तसाच उदार वृत्तीचा धर्मात्मा असल्या शिवाय साधरण लोकांत सर्वत्र त्यांची अशी प्रीतिपुरस्सर ख्याती कधींच झाली नसती.

एके ठिकाणीं आ साहेबांनीं शिवाजीचे वेळीं कोणीं एक साहेब हा देश पाहण्यास आला होता तो शिवाजीची प्रजा अति दरिद्री असें लिहितो, ह्मणून लिहिलें आहे. या ह्मणण्यांतील तथ्य काय असेल याचा निर्णय होत नाहीं; परंतु ग्रांट डफ साहेबांनीं यावरून शिवाजीची प्रजा गांजलेली असावी असा जो तर्क केला आहे तो मात्र आह्मांस मान्य नाहीं. त्या वेळच्या सर्व हिंदुस्थानांतील रयतेपेक्षां कदाचित् शिवाजीच्याच प्रजेस ज्यास्ती सुख असेलसें वाटतें. उत्पन्नाचेंच मानानें हा देश दरिद्री आहे. तेव्हां साहेबानीं जमिनीस जो दोष द्यावयाचा तो शिवाजीस दिला असावा. शिवाजीच्या कारकीर्दींत वर्षाचे वर्षास पिकाची पाहणी होऊन त्या मानानें सारा द्यावा लागत असे हेंही तसल्या दंग्याधोक्याचे वेळीं चांगलेंच होतें.

असें असतां शिवाजीची प्रजा विशेष गांजलेली कां असावी हें आम्हांस कळत नाहीं. शिवाजी पासून त्याच्या प्रजेस दुःख होत असतें तर त्यांस जशी रतयेनें प्रीति पुर-

स्तर मदत दिली व त्याचा जयजयकार सर्वत्र केला तसा केलाच नसता. लढाईचे वेळीं करभार रयतेस मोठा सोसावा लागतो खरा; परंतु तो घालणारा आपला त्राता आहे किंवा जुलमी आहे हें त्यांस चांगलें समजतें. याचप्रमाणें यित्येक ग्रंथकारांनीं निरंतर शिवाजीस केवळ शिव्यांचा भडिमार केला आहे. परंतु तेव्हांची युद्धाची रीति व शत्रूंशी वागण्याची रीती व राज्यनीति, यांचा पूर्ण विचार केल्याशिवाय उगीच शिव्या दिल्या आहेत असें वाटेल. आज ज्या गोष्टी आह्मांस निष्पापशा वाटतात, त्याच आणखी पन्नास वर्षांनीं कदाचित् विद्येच्या प्रसारानें व इतर कारणांनीं पापमूलशा वाटतील. आज लोक जनावरांचा प्राण घेऊन यथेच्छ भोजन करितात; आणखी पन्नास वर्षांनीं कदाचित् त्यांचे वंशजांस दया येऊन ते प्राणघात करणार नाहींत; परंतु या पन्नास वर्षांनीं झालेल्या जर एकाद्या पुरुषानें पूर्वींही मांस खाण्याची रीत साधारण होती व यांत त्याना पातक वाटत नव्हतें, या गोष्टीचा विचार न करितां, व त्या वेळेस योग्य रीतीनें दूषण न लावितां, त्या काळांतील एकाच पुरषास जर दोष लाविला, तर तें साजेल काय? परंतु हें उदाहरण आह्मी दिलें आहे तसेंच त्यांनीं शिवाजीस केलें आहे. त्या वेळीं लढाईचा क्रम किंवा शत्रूंशी वर्त्तन करणें तें केवळ शिवाजीच्याच करण्याप्रमाणें असे. इतकेंच नाहीं, परंतु शिवाजी प्रमाणें विनाकारण रक्तपात होऊं नये म्हणून जपणारे व इतर आदी ज्या क्षत्रियांनीं पाळाव्या अशी हिंदुशास्त्राची त्यांस आज्ञा आहे त्या पाळणारे योद्धे त्या वेळीं हिंदुस्थानांत फारच थोडे होते. मुसलमानांत तर एकही नवता. शिवाजी आपल्या हातीं शत्रूचे पुष्कळ लोक पडले असतांही त्यांस सोडीत असे; व शत्रुस्त्रिया सांपडल्या असतां ऊगाळ त्यांची विटंबना करीत नसे, इतकेंच नाहीं, परंतु त्या अबला असें समजून त्यांच्या सोयऱ्या धायऱ्यांचा शोध

करून त्यांजकडे त्यांस पाठवीत असे; याविषयीं हस्तलिखित*ग्रंथांत एक चमत्कारीक गोष्ट सांपडते; ती ग्रांट साहेबांचे ग्रंथांत नाहीं म्हणून आह्मी येथें सांगतो.

शिवाजीच्या लोकांनीं कल्याण लुटलें त्यावेळेस त्यांना तारुण्य व सौंदर्य इत्यादि गुणेंकरून मंडित अशी एक यवनी सांपडली तेव्हां लोकांनींही आपल्याच उपयोगाकरितां ठेवावी असें शिवाजीस सुचविलें असतां त्यानें तीस आपल्या समोर आणून, तिचें तोंडाकडे पाहून हांसून उत्तर केलें कीं, जर ही माझी मातोश्री असती तर मी इच्यासारखाच सुंदर झालों असतों. मग त्याने त्या स्त्रीस वस्त्रें भूषणें देऊन तिचे भ्रताराचा शोध करून त्यांकडे पाठवून दिली. या प्रकारच्या गोष्टी त्या ग्रंथकारांस माहित नसतीलसें वाटतें.

लोकांच्या विवाहित स्त्रिया हिराऊन घेण्याकरितां मोहिमा करणाऱ्यांच्या इतिहासकारांनीं शिवाजीस अनीतिमान, दगलबाज व चोर इत्यादि पाहिजे तसे दोष दिल्यास ते त्यांस शोभणारच आहेत; परंतु इतरांनीं अशांची सद घेऊं नये. शिवाजीनें अफझुलखानाचा वध केला त्या संबंधें त्यास दगेखोर ह्मणण्याचा पाठ आहे. परंतु या संबंधें खरी गोष्ट काय आहे, मराठी इतिहासकारांचें काय ह्मणणें आहे, याचा विचार केला पाहिजे. तो ग्रांट साहेबांनींही केला नाहीं ही मोठीच शोचनीय गोष्ट आहे. †

जें जें शिवाजीनें केलें तेंतें दोषरहित असें आह्मीं ह्मणत नाहीं. परंतु त्याचें अंगीं दोषांपेक्षां गुण सहस्त्रावधि अधिक होते असें आमचें मत आहे. तो सत्तालोभी तर होताच; परंतु त्यास हिंदुधर्माचा मोठा अभिमान होता, व गोब्राह्मण यांचें चांगलें करावें असा त्याचा पूर्ण निश्चय होता; म्हणून

---

* आलीकडे चिटणिसांचें सप्तांकी शिवाजीचें चरित्र विविधज्ञान विस्ताराचे मालिकांनीं छापिलें आहे तें पहा.

† परिशिष्ट ६ वें पहा.

असें ह्मणणें भाग आहे कीं, त्यानें जें जें केलें तें तें केवळ सत्तेच्या किंवा पैशाच्या लोभानेंच केलें असें नाहीं.

शिवाजीचें चरित्र हिंदु शिवाय इतरांस यथायोग्य कळेल असें नाहीं. महासमर्थ स्वामी रामदास यांस भिक्षेंत सर्व राज्य अर्पण करणें, रिष्यशृंगीं गेल्यावर सर्व राज्य त्याग करून तप करण्यास सिद्ध होणें, अवरंगजेबाचें हातावर तुरी देऊन परत येतांना तीर्थाटन करणें, स्त्रीनें चुडेदान मागितल्यावर तिचा भर्ता आपला शत्रु असतां आपले जीवितास धोका बसेल याची भीती न बाळगितां त्यास सोडून देणें, * इत्यादि शतशः महाराजांचीं कृत्यें हिंदुधर्म शास्त्राची किल्ली हातीं न घेतल्यास पूर्ण अवगत होणार नाहींत.

आह्मीं शिवाजीच्या धर्मनिष्ठेविषयीं बोललों. त्यावरून दुसरा एक विचार सुचतो. तो हा कीं, यावेळीं आमचे देशांत प्रख्यात साधु फार झाले. त्यांच्या कवनांनीं, कीर्तनांनीं, आणि उपदेशांनीं, तसेंच त्यांच्या पुराणांतील गोष्टीकथनांनीं, मराठे यांच्या देशांतील लोक मोठे धर्माभिमानी झाले होते.ते एकंदरींत पहातां मुसलमानांचा द्वेष फार करीत.या पुरुषांपैकींच शिवाजी एक होता.यावेळीं रामदास, तुकाराम, निंबराज व या शिवाय पुष्कळ सज्जनगडसंबंधीं साधु झाले होते. त्यांच्यायोगें आपले लोकांचें मनांत स्वराज्य स्थापण्याविषयीं.मोठी ईर्षा उत्पन्न झाली आणि मुसलमानांवर कहर गुदरला.हे वर सांगितलेले साधु यांणीं आपल्याग्रंथांत मुसलमानी राज्याचा द्वेष वाटण्यासारखें कांहींच लिहिलेंले नाहीं.त्या साधूंचें ऐहिक विषयांकडे इतकें दुर्लक्ष्य होतें कीं, त्यांच्या देशबांधवांच्या भगव्या झेंड्याचा चोहींकडे विजय होत असतां त्यापासून त्यांचे मनास यत्किंचितही विकार झाला नाहीं. असें असतां आमचे देशाचे उत्कर्षास हे सहज कारण झालें. तें असें. या कवींनीं आमच्या पुराणकथारूप भांडारांतील शूरत्वाचीं कृत्यें आपल्या

---

* परिशिष्ट ७ वें पहा.

कवितेंत (केवळ परमार्थाकरितां ह्मणून) गाइलीं व तेणेंकरून त्यांचे धर्मनिष्टबंधु ईर्षेस पडले. पुढें जसा मराठ्यांचा उत्कर्ष फार होऊं लागला तसें त्यांचें अनुकरण करणारे त्यांस पुष्कळ मिळाले. पुष्कळ मुसलमान कबीरपंथी झाले व पुष्कळ मुसलमानांनीं हिंदुधर्म स्वीकारून अल्ला व विठोबा एकच असें समजून कृष्णाचे व विठोबाचे अभंग केलेले सांपडतात. या मुसलमान साधूंचे सांप्रदायी अद्यापिही कोठें कोठें आहेत.

रोमन लोकांचें जगभर पसरलेलें राज्य व्यांडल लोक व गॉथ लोक यांनीं जसें कांहीं दिवस लुटून ओसाड पाडिलें, त्याप्रमाणेंच मुसलमानांची प्रचंड बादशाही मराठ्यांनीं ओसाड केली होती. त्यांत फरक इतकाच कीं, व्यांडल लोक यांचा व रोमन लोक यांचा विशेष शत्रूभाव असण्याचा संबंध नव्हता. जसें हिंदुंस मुसलमानांनीं गांजिलें होतें तसा कांहीं प्रकार व्यांडल लोकांविषयीं नव्हता. जशी शेतावर टोळांची गर्दी कारणावांचून आकस्मात् येते व निघून जाते त्याप्रमाणें ते रोमन लोकांवर स्वाऱ्या करीत असत. आणि मालकम साहेबांचे ह्मणण्यांत असें आहे कीं, जसे हे युरोपांतील रानटी लोक सर्व प्रकारें लोकांस त्रास देत व त्यांच्या स्त्रियांची विटंबना करीत त्याप्रमाणें पूर्वींच्या मराठ्यांनीं कधींच केलें नाहीं. रोमन लोकांच्या प्रचंड बादशाहीशीच आणखी एक तुलना करितां येईल. आरब लोकांनीं जसें रोमन लोकांचें राज्य घेतलें, त्या प्रकारानेंच मराठ्यांनीं मोगलांचें राज्य घेतलें. जशी रोमन लोकांची स्थिति बिघडली होती तशीच मोगलांची बिघडली होती. कोणत्याही लष्करी व मुलकी अधिकाऱ्यास स्वार्थाशिवाय दुसरी कांहींच इच्छा नसे. स्वार्थ साधल्यास ते पाहिजे तें करण्यास राजी असत. इकडे आरब लोकांची तर उलट स्थिति होती. अशीच स्थिती मराठ्यांचीही झाली होती. त्यांचे आपल्या देशाचे व धर्माचे साठीं त्यांस प्राण देणें ह्मणजे कांहींच नाहीं असें वाटत असे. आरब

लोकांचीं जशीं लष्करी कृत्यें त्वरित होत तशींच मराठ्यांचींही होत. आरब लोकांचे लष्करास खर्च लागे त्यापेक्षांही मराठ्यांचे लष्करास कमी लागत असे. मराठ्यांचे राकटपणाविषयीं असें लिहिलें आहे कीं, वीस पंचवीस कोसांची मजल करून शेतांतील धान्याचें कणसांवर ते कांहीं दिवस काढीत. व ते खर्च फार जपून करीत, ह्मणून त्यांचा खजिना सतत भरलेला असे. ही आरबी लोकांची साम्यता दाखविली याशिवाय या दोही लोकांचे उत्कर्षास त्या त्या देशांतील घोडे कारण झाले, ही एक दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

तिसरी गोष्ट अशी आहे कीं,आरब लोक पूर्वीं युद्धांत निपूण नव्हते; परंतु ते धाडशी व राकट असत, ह्मणून त्यांस रोमन व रशियन बादशाह आपले चाकरीस ठेवूं लागले. तेव्हां त्यांस युद्धकौशल्य येऊन ते त्या दोनही बादशाहीस बाधक झाले. याप्रमाणेंच मराठे मुसलमानांचे लष्करांत प्रथमतः बलिष्ट झाले, व त्यांस बाधक झाले. आरब लोकांचे लष्करी नियम व शिवाजीनें केलेले लष्करी नियम यांमध्यें इतकें साम्य आहे कीं, तें साहजिक घडलें असें ह्मणतां येणार नाहीं. जी लूट मिळेल ती ज्याची त्यानें न घेतां सरकारांत हजर करावी व सरकारांनीं त्यांतील योग्य वांटा बक्षीस ह्मणून त्या शिपायास द्यावा, असा शिवाजीचा नियम होता; तसाच आरब लोकांचाही असे. घोडेवाल्याचा व साध्या शिपायाचा पगार यांचा नियम व इतर कांहीं गोष्टी यांतही पुष्कळ साम्य आहे; परंतु शत्रूंशी वर्तन करण्याचे नियमांत तर फारच, ह्मणून आह्मीं येथें एक ‘ अबुबकर ’ यानें त्याचे हाताखालील एका सरदारास वर्तनाविषयीं जे नियम सांगितले ते व शिवाजीचे नियम असे एकाजवळ एक लिहितों.

‘जेव्हां शत्रूंची व तुमची गांठ पडेल तेव्हां पुरुषांस योग्य

अबुबकराचें पत्र.

असें वर्तन करा, व शत्रूंस पाठ कधीं दाखवूं नका. जर तुह्मांस जय प्राप्त झाला तर लहान मुलांचे जीव घेऊं नका, झातारी माणसें व स्त्रियां यांचेही जीव घेऊं नका. नारळाचीं झाडें तोडूं नका किंवा पिकास आलेलें शेत जाळूं नका. फळांचीं झाडें तोडूं नका व जनावरांचा नाश करूं नका. जेवढीं तुह्मांस खाण्यास लागतील तेवढीं मात्र मारा. * * जसजसे तुह्मी पुढें जाल तसतसे कित्येक धार्मिक पुरुष निर्जनप्रदेशीं मठांत धार्मिक रीतीनें ईश्वराची सेवा करितांना व वेळ घालवितांना सांपडतील त्यांना उपद्रव देऊं नका, त्यांनां मारूं नका किंवा त्यांचे मठाचा नाश करूं नका. ”

शिवाजीचे नियम.

“जेव्हां शिवाजी फौज ठेवूं लागला तेव्हां कोणा आपल्या जन्या चाकरांस जामीन घेतल्यावांचून नवीन नोकर ठेवीत नसे. कोणास कांहीं लूट किंवा शत्रूंचा कांहीं जिन्नस सांपडला असतां त्यानें तो जिन्नस सरकारांत नेऊन द्यावा. मग त्याचे योग्यतेप्रमाणें त्यास कांहीं विभाग बक्षीस देऊन त्याची प्रशंसा करावी अशी चाल होती. शिवाजीनें शत्रूंस लुटावयाची मनाई केली नाहीं; परंतु गाई व शेतकरी लोक व बायका यांस उपद्रव करूं नये; आणि मुसलमान लोक व त्यांचे पक्षपाती हिंदु असतील त्यांस धरून नेऊन पैका घेऊन सोडून द्यावें असें केलें होतें” मुसलमानांच्या मसजीदीस किंवा दरग्यास शिवाजी बहुदां उपद्रव करीत नसे.

शिवाजी मोठा कल्पक व चतुर होता. अशी दंतकथा आहे कीं, त्यास पुरतेपणीं आपली सही सुद्धां करितां येत नव्हती. असें असतां त्यानें आपल्या राज्याचा पाया शुद्ध घातला होता, व त्याचे नियमास अनुसरून जर पुढें मराठे लोक चालते तर त्यांच्या स्वराज्याचा नाश झाला इतका जलद कधींच झाला नसता; परंतु तसें न झाल्यामुळें मराठ्यांसारखे यांढे

प्रथम कष्टास व तदनंतर परराज्यास वाहणारे असे झाले. शिवाजी सरसकट सर्वांस पगार देत असे. लष्करी चाकरीकरितां जहागीर वगैरे देत नसे. ही गोष्ट त्याचें शहाणपणाची साक्ष आहे. मोंगल पादशाहींत जहागिरी इतक्या मोठ्या मोठ्या असत कीं, व त्या जहागीरदारांस असे हक्क असत कीं, आपला चाकरपणा सोडून स्वतंत्रपणें वागण्यास त्यांस सुलभ पडे. बंगाल्याची सुभेदारी व दक्षिणेची सुभेदारी इत्यादि सर्व याच कारणानीं स्वतंत्र राज्यें झालीं; व त्याप्रमाणेंच शिवाजीचे मागें मराठी राज्याची स्थिति झाली. जो ज्या सरदारानें मुलूख जिंकावा त्याची वहिवाट त्या सर करणाराचेच कुळांत होत गेल्यानें ते त्या मुलखाचे राजे असे बनले. व त्यांमध्यें व त्यांचे धन्यामध्यें विशेष फरक राहिला नाहीं. शिंदे, होळकर व त्यांचे यजमान पेशवे यांच्यामध्यें या रीतीनें इतका थोडा फरक राहिला होता कीं, परराज्याशीं पेशवे यांणीं जे तह करावे त्यांस शिंद्याची किंवा होळकराची जामिनकी लागत असे! याप्रमाणें मराठ्यांचे पादशाहीचा उत्कर्ष होत असतांच मध्यें एक विष कालविलें गेलें. या विषानें तिचा प्राण गेल्याचें आह्मास कांहीं आश्चर्य वाटत नाहीं; परंतु तो प्राण जाण्यास इतका वेळ कसा लागला याचें आह्मास नवल वाटतें. एका फारसी ग्रंथकारानें याविषयीं असें लिहिलें आहे कीं, हे रानटी मराठे सांपाच्या शरीराप्रमाणें* आहेत. त्या सांपाचे जरी तुकडे तुकडे केले तरी ते चळवळ करितात इतकेंच नाहीं; परंतु पुनः देखील मिळतात. दुसरें कारण मराठे लोकांची स्वामिभक्ति हें आहे असें आह्मांस वाटतें. मालकम साहेब असें ह्मणतात कीं, शेवटील बाजीरावास जर यत्किंचित् ज्ञान असतें तर या लोकांच्या गुणापासून त्यास मोठा उपयोग होता. मराठ्यांच्या घरगुती व साधारण रीतीभाती यांहीं करून त्याचे उत्कर्षास मोठें साहाय्य झालें. मराठ्यांचे मोठे मोठे सरदार

---

* सांपाविषयीं ही गोष्ट खरी आहे असें नाहीं.

हे आपणास नाईक, पाटील व चौधरी हीं विशेषणें लावून त्यांत मोठें भूषण मानीत असत; व त्यांचा स्वतःहाचा डामडौल फार कमी असे; व त्यांचे अंगीं पराक्रम फार असे, यामुळें सर्व रयत लोकांस जरी त्यांचे उच्छृंखळपणाचा क्वचित् त्रास येई तरी हे आपल्या प्रतीचेच लोक आहेत असें वाटून आनंद होई. मोंगल लोकांचे सरदार ऐष आरामांत असत व त्यांचें अंगीं तेव्हां पराक्रमही कमी होता ह्मणून त्यांची लोकांत हेळणाच होई.

शिवाजीच्या चातुर्याचें वर्णनांत, त्यानें इतरांप्रमाणें मोंगलांची सड घेतली नाहीं ही गोष्ट मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्यानें अष्टप्रधानांचीं नांवें संस्कृत ठेविलीं. ही गोष्ट जरी लहान आहे तरी तीवरून त्याची स्वदेशावरची व स्वभाषेवरची प्रीती दिसून येते. सर्व अष्टप्रधानांस पाहिजे तेव्हां युद्धास जावें लागेल असा नेम केला असे; व त्यांस सध्यांचे रेव्हेन्यु कमिशनरां इतके पगार असत.

शिवाजीचे मागें त्याचा मुलगा संभाजी हा गादीवर बसला. त्याचें राज्यांत महा प्रयासानें शुद्ध पायावर स्थापिलेलें जें नूतन मराठ्याचे राज्य तें क्षयास जाण्याचा बेत आला होता; परंतु त्यास अवरंगजेबानें निर्दयपणें तुळापुरीं मारिलें तेव्हां शिवाजीचे मुलाची अशी दुर्दशा केली ह्मणून मराठे कोपास चढले, आणि दक्षिणेंत थोडा बहुत जो मराठ्यांचा पराभव अवरंगजेबानें केला होता त्यापासून जसें एखादें झाड यथायोग्यकाळीं खच्ची केल्यानें बळावतें त्याप्रमाणें मराठी राज्य उत्तम वृद्धीप्रत प्राप्त झालें. "ज्याजवळ घोडा व भाला, तो मोंगला मागें लागला. *" एखादा जुनाट वटवृक्ष असतो व त्याच्या पारंब्या जमिनींत जाऊन नवीं नवीं झाडें उत्पन्न होतात, व त्यांतील कित्येक अशीं माजतात कीं त्यांतील मूळवृक्ष कोणता हें सांगतां येत नाहीं, याप्रमाणें आमच्या देशबांधवांच्या टोळ्या जिकडे तिकडे मोंगलांचे रा-

---

* क्याप्टन् ग्रांट डफ.

ज्यांत यावेळीं पसरल्या व त्यांतील मुख्य कोणती हें कळेनासें झालें. या वेळीं दोन प्रख्यात योद्धे झाले. एक संताजी घोरपडे व दुसरा धनाजी जाधव. धनाजी जाधवाचा पराक्रम असा होता कीं, मोंगल लोक त्यास दुसरा यमच मानीत. एकादे वेळेस घोडा पाणी पिईनासा झाला किंवा बुजू लागला ह्मणजे ते त्यास चेष्टेनें ह्मणत कीं, तुजला धनाजी दिसूं लागला कीं काय? ह्या दोन विख्यात योद्ध्यांचा एकमेकांशीं द्वेष होता. त्यामुळें संताजी घोरपडा मारिला गेला. यांत राम राजाचा हात होता; ह्मणून हा त्याकडून मोठा प्रमाद झाला. तेव्हां त्याचे पदरचे लोक आपल्या राजाची चाकरी सोडून हिंदुस्थानांत शिपाइगिरी करून पोट भरूं लागले.*

त्यांत त्याचा वंशज मुरारराव घोरपडे (जो क्लाइव अरकाटचे किल्यांत घेऱ्यांत सांपडला असतां त्यास मदत करणार होता तो) मोठा शहाणा व हिंमतवान पुरुष झाला. हा आपणाजवळ महाराष्ट्र देशांतील निवडक दहा बारा हजार स्वार बाळगीत असे. त्यांच सैन्याचे ऑर्म साहेबानें असें वर्णन केलें आहे:—"सन १७४६ त मुरारराव यानें त्रिचनापल्लीचा किल्ला निजाम उल्मुलुक याचे स्वाधीन केला. त्यावर त्यानें त्यास एक संस्थान स्थापण्याची परवानगी दिली. त्या संस्थानचा दक्षिणेचा सुभेदार याशीं संबंध होताच, परंतु त्याचें स्वकीय राज्याशीं (ह्मणजे मराठी राज्याशीं संबंध) नव्हता. ज्याप्रमाणें सर्व नवीन संस्थानांचा बेत पुष्कळ दिवसांच्या जुन्या संस्थानांपेक्षां मेहनतीनें व लक्षपूर्वक होतो त्याप्रमाणेंच यानें आपल्या राज्यांत बंदोबस्त ठेवून असमंतांतील लोकांत मोठी मान्यता मिळविली. हा आपले लष्करांत महाराष्ट्र मुलखीच्या लोकांशिवाय कोणास ठेवीत नसे, व ठेवणें तेंही त्यांच्या शौर्याच्या प्रचीतीशिवाय ठेवीत नसे. आणि ह्यांच्याशीं तो असा कृपाळूपणानें वागत असे कीं, चाकरी सोडून जानें

* डफकृत मराठ्यांची बखर.

असा विचार त्यांचे मनांत कधींच येत नसे; परंतु तें सर्व सैन्य जसें काय एक कुटुंबच असें वागे. सर्वांस लुटीचा वांटा यथान्याय मिळत असे ह्मणून त्यांस मर्दुमकीचीं कामें करणें आवडून त्यांस श्रमांची गणना नसे. कांहीं कार्य करण्यास नसलें तर मात्र ते कुरकुर करीत. त्यानें आपले हाताखालीं जे कामगार नेमिले त्यांवरूनही त्याचे गुणाची परीक्षा होते; कारण त्याचे सैन्यांत १०० स्वारांवरच्या अधिकाऱ्यांत असी कोणी नव्हता कीं, ज्यास सर्व सैन्यावर मुख्य सरदार नेमिल्यास साजणार नाहीं. परंतु असेंही असतां जो तो आपले हुद्यांत खुष असे, व एकमेकांशीं केवळ स्नेहभावानें राहून आपले धन्याचे अर्जित तत्पर असे. या कारणामुळें या वेळीं सर्व हिंदुस्थानांतील नेटिव राजांचे हाताखालचे शिपायांत यांचेसारिखे उत्कृष्ट शिपायी कोठें नव्हते. सर्व महाराष्ट्र मुलकीच्या शिपायांस, चापल्य, युक्ति आणि आपला घोडा वागविण्याचे ज्ञान व तरवारीनें युद्ध करण्याचें कौशल्य इत्यादि गुण असतात; ते तर यांचे अंगीं असून युरोपियन लोकांशीं लढाया करून करून कितीही कौशल्यानें तोफा वगैरेंचा भडिमार केल्यास त्यांचें भय हे फारसें गणीत नसत. आणि याहून चमत्कारिक गोष्ट ही कीं, मोठमोठ्या तोफांचाही मार केला असतां हे शत्रूंची पाठ सोडीत नसत. ज्या लढाईचें वर्णन आह्मीं चालविलें आहे त्या पूर्वीं तोफादिकांचा उपयोग हिंदुस्थानांत कधीं झाला नाहीं. यावेळीं ज्याप्रमाणें पूर्वीं हिंदुचे पूर्वज बंदुकांस भीत त्याप्रमाणेंच ते लोक तोफांस भीत असत; असें असतांही हे त्यांची अवगणना करीत."*मुराररात्र हा खड्यांचे लढाईत मराठ्याकडे होता. त्यास पुढें निजामानें घुटी येथें जाहागीर दिली. इतकी बारीक माहिती सांगण्याचें कारण, त्या वेळीं इंग्रज व फ्रेंच लोक यांजमध्यें लढाया चालू असत; ते एकमेकांशीं आपण होऊन भांडण्यास

*ऑर्म. पुस्तक १ पान ३६४—६५.

असमर्थ होते; ह्मणून ते विरुद्ध राजांचा पक्ष घेऊन त्यांचे सहायानें एकमेकांशीं भांडत असत. या खटल्यांत मुराररराव जो जास्ती पैसा देईल त्याचा पक्ष धरून मोठ्या डोईजडपणानें वागत असे. यावरून हा जो मराठ्यांचा एक बाहेर पडलेला सरदार याचे सामर्थ्यावरून तेव्हां मराठीराज्याचें सामर्थ्य केवढें होतें व इंग्रज किती बलहीन होते याचा तर्क करितां येतो. ह्मणून याची इतकी माहिती सांगितली. यावेळेस मराठ्यांनीं आपले राज्यांतील रयतेचा बंदोबस्त चांगल्या प्रकारें ठेविला होता, यास पुष्कळ ग्रंथांची साक्ष आहे; परंतु युद्धामध्यें मोंगलांचे रयतेस अनिर्वाच्य पीडा दिली, व लुटीशिवाय इतर गोष्टींकडे दुर्लक्ष्य केलें. असें न करितां इंग्रजांप्रमाणें मोंगलांचे रयतेस अश्वासन दिलें असतें तर त्यांचें हिंदुस्थानांत सर्वत्र राज्य झालें असतें, यांत संशय नाहीं.

रामराजाच्यामागें कांहीं खटपट होऊन पुढें मराठ्यांचा राजा शाहू झाला. त्याचे राज्यांत विशेष ह्मणण्यासारखीं दोन कृत्यें झालीं. एक तर शाहू आपणास मोंगलांचा आश्रित असें ह्मणे; व त्याचे राज्यांत पेशव्यांचें महत्व फार वाढून सातारचे राजे केवळ नामधारक झाले. पुढें जे पेशवे झाले त्यांनीं उत्तम प्रकारें राज्य केलें. पेशव्यांचे कारकीर्दींत पुष्कळ युद्धें झालीं व मराठे सर्वत्र विजयी झाले; इत्यादि सर्व हकीकत सांगणें ह्मणजे वेळ फार लागेल, व आमची खात्री आहे कीं, त्याविषयीं थोडीबहूत माहिती नाहीं असा या सभेंत एकही मनुष्य नसेल. बाळाजी विश्वनाथ यापासून रयतेचे सुखाकडे विशेष नजर पोहोंचली. बाळाजी विश्वनाथ तर कारभाराचे शिणानें मेला असें कपतान् ग्रांट डफ साहेबाचे बखरींत आहे. यापुढें बाजीराव पेशवा झाला. तो सकळ गुणांनीं युक्त होता. याचे कारकीर्दींत चिमणाजी आपा यानें युरोपांतील पोर्तुगीस लोकांस जिंकिलें. चिमणाजी आप्पाचे वर्तणुकीचें विवेचन करितांना ग्रांट साहेबाचे हातून

थोडी चूक झाली आहे असें वाटतें. ती ही कीं, चिमणाजी आपा पोर्टुगीस लोकांशीं लढत असतां त्यास असें वाटलें कीं त्यांच्याप्रमाणें शिकविलेलीं पलटणें मराठ्यांचे सैन्यांत असल्यास मोठा उपयोग होईल. याविषयीं ग्रांट साहेब असें ह्मणतात कीं ही त्यांची मोठी चूक झाली. व ही चूक मराठ्यांचेही लक्ष्यांत न येतां ते त्यास फार कुशल असें मानितात, व याच चुकीनें मराठे पलटणें ठेवून लढूं लागले त्यावेळेस त्यांची शक्ति नष्ट झाली. मराठे मोठे धीट, चपळ व छातीस छाती देऊन लढण्याचे कामीं अत्यंत कुशल इत्यादि गोष्टी त्यांचे लक्ष्यांत आल्या नाहींत. मराठ्यांचे युद्धांत कांहीं कलाकौशल्य नव्हतेंच असें आमचें मत नाहीं; व त्यांत सुधारणा करण्यास जागा नव्हती असेंही आमचें मत नाहीं. ही चिमणाजी आपानें काढलेली कल्पना पुढें महादाजी शिंदे यास फार ग्राह्य वाटून त्यानें फ्रेंच जातीच्या एका दीबायन, नामें सरदाराकडून आपले सेनेची सुधारणा केली; व तेणेंकरून त्याचा उपयोग किती झाला हें सर्वांस ठाऊक आहेच. शिंद्याचे लष्करांत एक व्यंग राहिलें तेणेंकरून महादजीच्यामागें त्याच्या राज्याची अव्यवस्था झाली. त्यानें पुढें आपल्या सैन्यांत आपल्या नवीन व विस्तीर्ण राज्यांतील मुसलमान व रजपुत यांची संख्या फार वाढविली, तेणेंकरून त्याचे सैन्यास मराठ्यांचें सैन्य असें नीट ह्मणतां येईना. या नवीन सैन्यास त्याचे गादीचा अभिमान असावा तसा नव्हता. "पाटल.च" मागें त्याचे राज्याचा जो घोटाळा झाला त्याचें कारण हें आहे. कवाईत शिकलेले शिपाई ठेविले ह्मणून त्याचा नाश झाला असें नाहीं. सध्यां इंग्रजी राज्यांत मांडचोळणा घालणारे, डोईस मुंडासें व ढालतलवार बाळगणारे, व हरहर ह्मणून छातीस छाती देऊन भांडणारे दक्षिणेंतील वाघ कां नाहींत! यावरून ती चिमणाजी आपानें चुकी केलिह असें तर नाहींच; परंतु हें कृत्य त्याचे चाणक्षपणाची साक्ष आहे

असें आह्मांस वाटतें. मराठी राज्य या चुकीनें बुडालें नाहीं, व त्याचे लयाचीं कारणें निराळीं आहेत. त्याचा विचार पुढें होईल. या पेशव्याचे राज्यांत रयतेस सुख बरेंच झालें.

याचेमागून याचा पुत्र बाळाजी बाजीराव हा पेशवा झाला; यास कित्येक इंग्रजी ग्रंथांत वाईट विशेषणें दिलीं आहेत; परंतु त्याचीं कारणें कोठेंही आमचे दृष्टीस आलीं नाहींत, ह्मणून त्या ग्रंथकारांचें खंडन करणें अशक्य आहे. याचे हातून कांहींच कपट झालें नाहीं असें आमचें मत्त नाहीं; परंतु क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग, डयुप्ले इत्यादि युरोपियनांपेक्षां हा जास्त अप्रामाणिक होता असें नाहीं. याचे कारकिर्दीत मराठ्यांच्या उत्कर्षाचा कळस झाला. या पेशव्यास आपल्या देशाचा आभिमान फार होता. यानें कांहीं वेळ मराठे सरदारांस एकमतें वागविलें हें त्याचे राज्यनीतीस मोठें भूषण आहे. याचे कारकिर्दींतच पानपत येथें लढाई होऊन मराठ्यांवर मोठा कहर गुजरला. या गोष्टीची माहिती सर्वांस आहेच. आह्मांस कांहीं विशेष माहिती एका हस्तलिखित बखरविरून मिळाली आहे. मल्हारराव होळकर यानें ती बखर लिहिली असें तिचे प्रारंभीं लिहिलें आहे. या लेखांत पानपतचे हकीकतीचें वर्णन फार सुरस केलें आहे. या लेखांत लढाईचे पूर्वी मराठ्यांची उमेद, त्यांचें यवनांशीं वांकडें, व हिंदुधर्माचे रक्षणार्थ* प्राण देण्याची आवड, याविषयीं उत्तम वर्णन आहे. पुढें मराठ्यांस जे हाल भोगावे लागले व विश्वासराव पडल्यावर भाऊसाहेबानें जो शोक केला, व आपण लढाईंत प्राण टाकिला इत्यादि प्रकरणांचे वर्णन, असें सुरस केलें आहे कीं, तें वाचतांना तात्काळ गहिंवर येतो. या ल-

* पानिपत हें गांव यमुनेजवळ आहे. कौरवपांडवांचा संग्राम याचे जवळच झाला व श्रीकृष्णानीं येथेंच आपल्या कित्येक चमत्कारिक लीला केल्या. मराठे अशा पुण्य भूमीवर होते ह्मणून फारच ईर्षेस पडले व त्यांनीं तहाचें बोलणें मोडिलें असें मल्हाररावाचे लेखांत आहे.

ढाईत मराठे पराभव पावले याचें मुख्य कारण भाऊसाहेबाचें अप्रयोजकपण हें आहे. ग्रांट डफ साहेबांनी या लढाईतील पराभवाचें कारण मराठ्यांचीं शिकविलेलीं पलटणें म्हणून लिहीलें आहे; या त्यांच्या ह्मणण्यास हा होळकराचा लेख प्रमाण आहे; परंतु हें ह्मणणें आह्मांस मान्य नाहीं; कारण सर्व होळकराचे घराण्यास दुरून दुरून लढाई करण्याचें कौशल्य असे; व तो तसेंच करण्यास मसलत देत असतां भाऊसाहेबानें ऐकिलें नाहीं ह्मणून त्यानें पलटणावर सर्व दोष दिला आहे असें वाटतें. मराठे या लढाईत हातघाईस फार लवकर आले व अफगाण लोक शरीरानें मोठे बळकट ह्मणून त्यांचा पराजय झाला हें जर खरें आहे तर पलटणापासून त्यांस उपयोगच झाला असेल. परंतु याच लढाईंत कित्येक वेळां मराठी स्वारांनीं शत्रूस हाटकून मग त्यावर जाऊन पडून त्यांचा सत्यानास कित्येक वेळां केला होता. मऱ्हाठ्याकडील कोणी सरदार ज्यास बळवंतराव पंवार अथवा जसवंतराव पंवार असेंही ह्मणत त्यानें एक प्रसंगीं पेशव्यांची हुजरात घेऊन जाऊन ५००० अफगाण एकदांच कापून काढिले. अशीं उदाहरणें पुष्कळ याच पानिपतचे लढाईंत झालेलीं आहेत. या लढाईंत अफगाण लोकांनीं जय मिळविल्यावर जे मराठे त्यांचे हातीं लागले त्यांचीं डोकीं मारून त्यांचे शिरांचे ढीग आपल्या डेऱ्यापुढें घातले. असें करून त्यांनीं सर्व मानव जातीस कलंक लाविला; कांकीं मनुष्यांमध्येंही असे दुष्टप्राणी सांपडतात, हें यावरून स्पष्ट दिसतें. हें त्यांचे शूरपणासही लांछन आहे. ज्या मराठ्यांनीं त्याच लढाईंत दोन वेळां त्यांस मागें हटविलें व एकदां पळून जाण्याचा प्रसंग आणिला होता; तेच शूर दैवानें पराभव पावले म्हणून त्यांची अशी विटंबना करणें हें कोणाही शूर मनुष्यास मानवणार नाहीं. मराठ्यांचें राज्य मोडण्यासही लढाई

मुख्य कारण झाली असें पुष्कळ इंग्रज ग्रंथकारांचें मत आहे. तें आह्मास ठीक वाटत नाहीं. आमचे देशाचे उत्कर्षास कांहीं दिवस व्यत्यय आला एवढें मात्र झालें. पुढें महादजी शिंद्यानें आपले कल्पनेनें व शौर्यानें मराठ्यांचें महत्व वाढविलें. पराभवाचे दुःखानें नानासाहेब मरण पावले. या वेळचे राज्यरीतीचें वर्णन ग्रांट डफ साहेबांनीं याप्रमाणें केलें आहेः—“ बाळाजी बाजीरावाचे वेळेस प्रजेला काय काय सुख होतें, तो शोध केला असतां असें दिसतें कीं, मक्त्याच्या मामलतीची चाल मोडली, व कोणी लुटारू आला असतां गांवकरी यांनींच मारावा, असें शिकविलें, तेणेंकरून प्रजा सुख पावली असेल. मग पेशव्यांनीं जागोजाग सुभेदार व मामलेदार ठेवून त्यांचे चौकशीवर सर सुभेदारही केले, आणि वसूल जमा करणाराचीही तपासणी व्हावी असा त्यानें बेत ठेविला होता. पुण्यांत बाळकृष्ण गाडगीळ मोठा कुलीन शास्त्री तो न्यायाधीश केला, यायोगें शहरचे लोक फार सुख पावले. या सर्व रीतींचें मूळ रामचंद्र बाबाशेणवई, तो मेल्यावर सदाशिवरावानेंही तसेंच चालविलें. त्या राज्यांत बहुतेक ब्राह्मणांचीं कुळें* योग्यतेस आलीं, आणि त्या राज्यांत प्रजेस सुख वाटून, लोक नानासाहेब धन्य प्रभू असें ह्मणूं लागले. ती कीर्ति अद्यापि लोकांत आहे.”

त्यानंतर माधवराव सातान्याहून पेशवाईचीं वस्त्रें पावला. त्याचे राज्यांत मराठ्यांचें गतवैभव पुनः सर्व आलें असें ह्मणण्यास चिंता नाहीं. याचे कारकीर्दींत सुजाउद्दवला (जो पानपतचे लढाईत अफगाणाकडचा होता) तो, व हैदरअल्ली यांस मराठ्यांनीं अगदीं नम्र केलें; व सेनापति विसाजी कृष्ण बिनीवाले यानें रजपूत लोकांपासून खंडणी घेतली. व भरतपुरासमीप मोठें युद्ध करून त्यांस जिंकिलें. पुढें दिल्लीचा बादशाह त्यांचे आश्रयास येऊन राहिला. हा शाहाअल्लम

* परिशिष्ट ५ वें पहा.

पादशाह अगदीं बलहीन झाला होता. तो जो कोणी बलिष्ठ असेल त्याचे आश्रयानें चाले. त्याच्या अंगीं पुरुषार्थ फार कमी असे; परंतु तो कवि होता. फारशी भाषेत यानें सुरस कवनें केलीं आहेत.* या पेशव्याचे कारकीर्दीत मराठ्यांनीं रोहिलखंडांत प्रवेश केला. रोहिले हे अफगाण लोकांतील एक ज्ञात होत. मोगल बादशाहींत आपल्या तरवारीच्या बळानें त्यांनीं ज्यास "रोहिलखंड" ह्मणतात तो सुपीक मुलूक जाहागीर मिळविला. पुढें जसें मोगलांचें राज्य बुडत चाललें तसें ते स्वतंत्रपणें वागूं लागले. त्यांचें सर्व सैन्य मिळून ऐंशी हजार असावें. † ते रोहिले लोक मराठ्यांस इतके भीत कीं मराठे आले असें ऐकतांच ते बळकट किल्ल्यांत असले तरी तेथून पळून डोंगरांत जात. ‡ हें जें पेशव्यांचें वैभव सांगितलें हें त्याचे राज्यनीतीशीं ताडिलें असतां केवळ क्षुद्र असें वाटतें. याही वेळेस रयतेस फार सुख होतें. होळकराचें राज्य या वेळेस अहल्याबाई करीत होती. ग्रांट डफ् साहेबाचे बखरींत वर सांगितलेल्या व्यंगाशिवाय आणखी एक व्यंग आहे. कोणत्याही राजाचे कारकीर्दींत जे मोठमोठे पुरुष झाले त्यांचे स्वभावाचें व वर्तनाचें ह्मणण्यासारखें वर्णन नाहीं. यामुळें अहल्याबाईसारखे परोपकारी रत्नाचे वर्तणुकीविषयीं ग्रांट डफ साहेबांचे ग्रंथांत पृष्ठ अर्ध पृष्ठापेक्षां जास्त मजकूर मिळणार नाहीं असें आह्मांस खास वाटतें. सर जान माल्कम यानें या बाईची पुष्कळ माहिती मध्य हिंदुस्थानाचे इतिहासांत लिहिली आहे, तदिरून असें कळतें कीं, या आमचे देशांतील धनगर कन्येसारखी परोपकारी व गुणवान अशी स्त्री सर्व पृथ्वीवर कोठेंही झाली नाहीं. माधवराव थेऊरास मरण पावला.

नारायणराव त्याचा भाऊ त्याचेमागें गादीवर बसला; यास

*परिशिष्ट ६ पहा. † मिल् ‡ ग्रांट डफ्.

गारद्यांनीं आनंदीबाई रघुनाथरावाची बायको हिच्या चिथावे- ण्यावरून मारिलें. त्यावर रघुनाथरावानें कांहीं दिवस राज्य केलें. रघुनाथराव मराठे सरदारांत मोठा शूर होता. बाळा- जी बाजीरावाचे वेळेस मराठ्यांस जिकडे तिकडे जय याचेच योगें मिळाले. पानिपतास सैन्यावर याचें अधिपत्य असतें तर कदाचित् मराठ्यांचा जय झाला असता. पंजाबांत लाहो- र यानेंच जिंकलें. परंतु यास राज्यनीति ह्मणजे काय हें मु- ळींच माहीत नव्हतें. यानें निजामावर जाऊन वीस लक्ष रु- पये वसुलाचा मुलूक तो देत असतां त्याचे गोड बोलण्याव- रून सोडिला. व हैदरास उलटी खंडणी देण्याचें यानें कबूल केलें; परंतु थोडेच दिवसांत पुण्यांत कट होऊन यास पदच्युत केलें.

नारायणराव याचे स्त्रीस तो मेल्यावर कांहीं महिन्यांनीं पुत्र झाला, त्याचें नांव सवाई माधवराव असें ठेवून यास पेशवा केला. या वेळेपासून मराठी राज्याचे मोडास प्रारंभ झाला. याचे कारकीर्दींत खर्ड्याची लढाई झाली, तींत मराठे जय पावले. खर्ड्याचे लढाईच्या वेळेस इंग्रज लोक निजामाचे मित्र होते; परंतु मराठ्यांपुढें आपला टिकाव लागणार* नाहीं, ह्मणून त्यांनीं निजामाचें सहाय्य केलें नाहीं. रघुनाथराव पदच्युत झाल्यावर त्यानें इंग्रजाची मदत घेतली; परंतु त्यांचे हातून त्याचें काम झालें नाहीं. कंपनी सरकारानें आपल्या नेहमींच्याप्रमाणें मुंबई सरकाराकडून मराठे यांचे राज्यांत आपला शिरकाव होण्याचे एक दोन प्रयत्न करून पाहिले; परंतु त्यांत ते मराठ्यांपासून पराभव पावून त्याचें किमपि कार्य साध्य झालें नाहीं. † यायोगें नानाफडणविसाची मोठी प्रतिष्ठा वाढली. शुद्ध मराठी पद्धतीप्रमाणें " इंग्रजाला

---

* या वेळेस कलकत्यास ' वारन हेस्टिंटिंग ' साहेब गवनर जनरल होते. मिलकृत ब्रिटिश इंडियांत या भागाचें कथन केलें आहे, तें जागोजागीं फार चुकलेलें आहे.

† हंदर.

खड चारील न्हाई लागू दिला थारा " असें नानाफडणविसाचे पवाड्यांत वर्णन त्यानें केलें आहे,तेंही बहुतेकांस माहीत आहेच.या वेळेपासून मराठी राज्य बुडण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. सर्व सरदार स्वतंत्रतेनें वागण्याची इच्छा करूं लागले इतकेंच नाहीं परंतु नानासाहेब ह्मणजे थोरले बाजीराव याचे कारकीर्दींत महाराष्ट्र मुलकीच्या सर्व लोकांस आपण महाराष्ट्र म्हणूनच जो एकीचा अभिमान उत्पन्न झाला होता तो यावेळीं लयास जाऊन ब्राम्हण व मराठे यांमध्यें शुष्क व संकोचित असा ज्ञात्याभिमान उत्पन्न झाला. होता. हा अनिष्ट परिणाम बहुतेक कोंकणस्थ ब्राह्मणांचे उच्छृंकळतेनें उत्पन्न झाला होता असें दिसतें. शिंदे व भोंसले यांनीं स्वतंत्र होण्याच्या कृत्यास मूळ पाया घातला. शिद्यानें हिंदुस्थानांत रोहिले, मोंगल, व रजपूत यांशीं लढाया करून मोठा पुरुषार्थ मिळविला; व आपली सेना सुधारली, याविषयीं पूर्वी लिहिलेंच आहे. तो महादजी शिंदाच स्वतंत्र राज्यस्थापावें असें इच्छीत होता असें *वाटतें. तो नानाफडणविसास प्रसंगीं मदत करी। परंतु सतत कांहीं तरी काढून त्यास चिंतेंत ठेवीत असे. व नानाफडणविस व माधवराव पेशवे हे दोघेही युद्धांत कुशल नसल्याकारणानें जी बचबच यावेळीं राज्यांत झाली ती मोठ्या उद्योगानेंसुद्धां त्यांस सुधारवेना इत्यादि कारणानें त्या वेळेस मराठी राज्यांत फार अंदाधुंदी झाली होती; व रयतेस पहिल्यासारखें सुख मिळेनासें झालें. सध्यांचे नेटिव संस्थानांत जो बेत असतो त्यापेक्षां तेव्हां चांगला नसेल.कदाचित् त्याहूनही वाईट असेल. पुण्यांत घाशीराम या नांवाचा कोतवाल होता. त्यानें तर इतका जुलूम चालविला कीं, त्यास शहरचे लोकांनीं घराबाहेर काढून दगडांनीं ठार मारिला. हा पेशवा, त्यास नानाची कैद सोसवेना ह्मणून, माडीवरून उडी टाकून, मेला.

---

* सरजान मालकम्.

त्याचेपुढें रघुनाथरावाचा पुत्र बाजीराव-हा कांहीं खटपट करून गादीवर बसला. मराठ्यांचें राज्य बुडविण्यास सर्व कारणांतून मुख्य कारण हा झाला. याचा एक निश्चय म्हणून कधींच होत नसे. व सर्वांस फसविण्याचे इराद्यानें यानें सर्वांचीही मनें दुखविलीं. कपट व अविश्वास हे दोन दुर्गुण औरंगजेबाचे अंगीं होते म्हणून मुख्यत्वें त्याचें राज्य बुडालें असें एलफिस्टन साहेबानें लिहिलें आहे; व तें केवळ सयुक्तिक आहे. परंतु हे दुर्गुण बाजीरावाचे अंगीं औरंगजेबापेक्षां सहस्रपट अधिक होते. याची वर्तणूक अशी होती कीं, यास चांगला कोणीच ह्मणूं नये, व याचा पक्ष कोणीच धरूं नये. याचे बापाच्याही अंगीं ज्ञान म्हणण्यासारखें नव्हतें. परंतु तो विख्यात शूर तरी होता. असें असतांही त्याचें कांहीं बरें झालें नाहीं. हे त्यांचे चिरंजीव मराठी ह्मणी प्रमाणें "उभे फोडले तर शंख व आडवे फोडले तर चक्र" असे होते. यांचें शौर्य तर लोकांस विदित आहेच. बंदुकीचा आवाज केला असतां हे लपून बसत; हें महाराष्ट्र देशांतील आबावृद्धांसही माहीत आहे. एशिआ खंडांत व विशेषतः हिंदुस्थानांत शुभाशुभ होणें राजांचे स्वभावावर व वर्तणूकीवर अवलंबून असतें. व यावेळेस हे दिव्य राजे असल्यामुळें मराठ्यांचे बादशाहीचा लय झाला!

मागें मराठ्यांचें उत्कर्षांत एक विष कालविलें गेलें ह्मणून लिहिलें आहे तें दुसरें कारण; व तिसरें कारण, या वेळेस शिंदे व होळकर व इतर मराठे सरदार यांनीं एके ठिकाणीं मिळून मोंगलांवर किंवा परशत्रूंवर हल्ला करण्याचें टाकून एकमेकांचेच राज्यांचा अभिलाप धरिला हें होय. शिंद्याच्या व होळकराच्या एकमेकाशीं लढाया होऊन त्यांनीं आपले सैन्य व द्रव्य खराब केलें. महादजी शिंद्याचे मागें दौलतराव शिंदा गादीवर बसला, तो युद्धांत अगदीं गैरमाहीत व राज्यनीतींत अज्ञाणी असा होता. याचप्रमाणें भोंसल्याचीही हकीकत होती.

हे सर्व एकमेकांत भांडून बळहीन झाले असतां, बाजीरावानें इंग्रजांशीं तह केला; त्यास बाजीरावाचेच* सांगण्यावरून अमान्य होऊन त्यांनीं इंग्रजांशीं युद्धप्रसंग एकेकट्यानें केले. त्यांत अर्थातच हे पराभव पावले. युद्धांत निपुण असा यशवंतराव होळकर मात्र या वेळीं मराठे सरदारांत होता. त्यास पूर्वी शिंद्याचेयोगें अशीं संकटें आलीं होतीं कीं, कांहीं दिवस त्याला बंडावांचून दुसरे उपाय नाहींसे झाले होते. मराठी राज्यांत पेंढाऱ्यांचा उपद्रव याचे पूर्वी नव्हता. ते मराठ्यांचे आश्रयानें इतर राज्यांत मात्र धांदल करीत. ते बाजीरावानें आपल्या मुलकांत आणून आपल्याच रयतेस लुटण्याची त्यांस आज्ञा केली. या कारणानें रयतेस असा शीण आला कीं, तेणेंकरून त्यांचीं मनें या राज्यावरचीं अगदीं उडालीं; आणि पेशवाई ह्मणजे अंदाधुंदी असा शद्बार्थ झाला; तो अजूनही प्रचारांत आहे. हा दोष सर्व पेशवाईस लावणें अनुचित आहे असें इतिहासदृष्टच्या पाहिलें असतां समजेल. एक बाजीरावाच्या राज्यांत अंदाधुंदी झाली ह्मणून सर्व मराठशाईस, जिच्यायोगें या मराठ्यांचे देशावर अगणित उपकार झाले आहेत, ते सर्व विसरून, तीस दोष द्यावा आणि तिचे गुणांचें वर्णन करूं नये हा केवळ एक पक्षाचा न्याय होय, असें आमचें मुकरर मत आहे. हें ज्यांस मान्य नसेल त्यानें इतिहासावरून जर कांहीं शंका काढिल्या तर त्याविषयीं विचार करण्यास व उत्तर देण्यास आह्मी फार खुषी आहों; परंतु आमचे आढळांत असें आलें आहे कीं, या गोष्टींविषयीं बोलत असतां, विषयाची इतिहासरीत्या कांहींच माहिती नसून मनःकल्पित अंदाधुंदीचा निषेध, व मनःकल्पित सुधारणेची स्तुति, बोलणाऱ्या मनुष्यांचे हातून फार होते. असें आधाररहित बोलणारांस आह्मीं कांहींच उत्तर देणार नाहीं. या

* सर जान मालकम्—“ मध्यहिंदुस्थानाचा इतिहास. ”

बाजीरावाचे कारकीर्दीची माहिती थोडीबहुत सर्वांस आहेच. जें विशेष सांगणें तें आह्मीं सांगितलें. आतां सांगण्याचें इतकेंच राहिलें आहे कीं, "सब्सीडायरी आलायन्स" या नांवाचे करार मराठ्यांनीं इंग्रजांशीं जे केले तेणेंकरून मराठी राज्यास मोठा धोका बसला. असो, बाजीराव कोरेगांवच्या लढाईंत पराभव पावल्यावर पळाला व त्याणें पेशवेपणाचा राजीनामा दिला. तेव्हां हा देश इंग्रजाचे हातीं गेला; व मराठेशाईचा शेवट झाला!!!

आतां यापुढील नवीन राज्यापासून हित काय झालें याचा विचार केला पाहिजे. या विषयावर लिहिण्याचें आह्मांस मोठें भय वाटतें; कारण बाजीरावाचे वेळीं जी गडबड झाली व रयत शिणली तेणेंकरून लोकांचें मनांत मोठे दुराग्रह उत्पन्न झाले आहेत. असें दुराग्रह झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतात. "पिझिस्ट्रेटस" यानें आथेन्नचें राज्य बळकाविल्यावर उत्कृष्ट रीतीचें राज्य केलें. तसेंच कांहीं दिवस त्याच्या मुलांनींही केलें; परंतु त्या मुलांचें राज्यांत शेवटील पांच वर्षांत फार जुलूम झाला. त्यायोगें लोकांचीं मनें त्या राज्यावरून इतकीं उडालीं कीं यांनीं पूर्वीं जितकीं सत्कृत्यें केलीं होतीं तितकींही ते विसरून गेले. * परंतु इतिहासकार मात्र विसरले नाहींत. तसेंच मराठ्यांचे इतिहासकारानेंही विसरूं नये हें आह्मांस वाजवी दिसतें.

"The evil that men do lives after them.
"The good is oft interred with their bones."*

या न्यायानें आमचे आधुनिक इतिहासकार चालतात.

---

* ग्रोट साहेबाचें मत असें आहे कीं, या वेळीं जीं आथेन्समध्यें सार्वजनिक इमारतींचीं कामें झालीं तीं सर्व केवळ लोकप्रीतीनेंच झालीं असें नाहीं. लोकांस कष्ट करण्यास वेळ व साधनें मिळूं नयेत ह्मणून तीं कामें उपस्थित केलीं असावीं असाही तर्क होतो; तरी ग्रोट साहेबाचे मतें तें राज्य वास्तविक जुलमी रीतें असें नाहीं.

† शेक्सपियरकृत "सीझर" नामक नाटक.

मराठ्यांनीं, ज्या देशांत शूर लोक नाहींत असा अपवाद झाला होता, त्या देशांत शौर्याचीं कृत्यें करून या देशास मोठेपणा आणिला. आपण कोणाचेही ताबेदार नाहीं असा भाव घालून स्वतंत्र राज्याचा पाया घातला व देशाभिमान धरिला; इत्यादि स्तुत्य कृत्यें करूनच जरी ते राहिले असते तरी ते स्तुतीस पात्र होते. त्यांचें राज्य धर्माचे व हिंदू जातीचे अभिमानानें उद्भवलें; तथापि त्यांच्या राज्यांत इतर धर्माचे लोकांस इजा पोंचली नाहीं. * ज्याप्रमाणें ब्राह्मण व मराठे लोकांस मोठमोठ्या जागा मिळत त्याप्रमाणेंच मुसलमानांसही मिळत. मराठ्यांचे मुलकांत मुसलमानांचे व मराठ्यांचे हिंदुस्थानांतील इतर भागांपेक्षां सख्य असतें, व वाह्यात्कारी देखील मोट्या शहरांतील मुसलमान खेरीज करून मराठ्यांमध्यें व त्यांमध्यें कांहीं फरक दिसत नाहीं, ही गोष्ट आमचे ह्मणण्यास सबळ कारण आहे.

हिंदुस्थानांतील हिंदु रहिवाशी व मुसलमान रहिवाशी यांचा एकमेकांशीं द्वेष व एकमेकाच्या भिन्न रीतीभातीविषयीं ज्यानें विचार केला असेल त्यास हें आमचें ह्मणणें अगदीं सयुक्तिक वाटेल. या गोष्टींचा विसर लोकांस पडला आहे असें लोकांचे साधारण बोलण्यावरून दिसतें, ही फार खेद वाटण्यासारखी गोष्ट आहे.

इंग्रजी अमला-वर टीका.

इंग्रजी झाल्यापासून हा मुलुक इंग्रजांच्या हिंदुस्थानी बादशाईतील एक भाग झाला. या नवीन बादशाईत ज्या कित्येक लोकांस मराठे आपली प्रजा नव्हे असे ह्मणत अशांचाही समावेश झाला आहे. यामुळें मराठ्यांपासून उपद्रव पावलेल्या प्रजेस सुख झालें यांत संशय नाहीं. व या मानानेंच सर्व हिंदुस्थानचें एक राज्य असें कल्पून इंग्रजाचे राज्यापासून काय काय नफे झाले याची बरोबर अटकळ बांधणें फार कठीण आहे. त-

* सरजान माल्कम्.

थापि देशास एकंदरीनें मोठा नफा झाला, व पुढें आमचे लोक स्वतः याहूनही मोठा नफा करून घेतील, अशीं चिन्हें दिसत आहेत. हा फायदा लहान नव्हे; हा विषय प्रस्तुतचे निबंधाचे बाहेरचा असल्यामुळें यावर विस्तारें लिहितां नये. सांप्रत सर्व देशभर स्वस्थता आहे ही काय ती या राज्यांत साऱ्याहून मोठी गोष्ट आहे. परंतु लोकांवर सरकारचा पूर्ण विश्वास नसल्या कारणानें त्यांस निर्वीर्य करण्याचे प्रयत्न चालले आहेत. हत्यारांचें कौशल्य व 'मिलिशिआ' इत्यादि गोष्टि तर राहोत, परंतु हत्यार नुसतें बाळगण्याची देखील मनाई आहे. ही स्थिति चांगली असें कोणी ह्मणणार नाहीं. सडका बांधणें व इतर लोकोपयोगी कामें करणें, विद्यावृद्धि करणें या आणखी या राज्यांतील मोठ्या गोष्टी आहेत. यांतील दुसरी गोष्ट विचार केला असतां फार मोठी आहे असें नाहीं. हिंदुस्थान कसें तरी दोन शतकें इंग्रजांचे हातीं आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं. या इतक्या काळांत ज्याप्रमाणें लोकोपयोगीं कामें व्हावीं त्याप्रमाणें बिलकुल झालीं नाहींत. आमचें सध्याचें सरकार सुधारणुकी करण्यास अमळसें जड आहे असें वाटतें. लोकांचे हक्क वाढवावे हें त्यास समजण्यास सन १८५७ चे बंडाप्रमाणें बंड झालें तरच कळतें. ओरिसा प्रांतांतील दुष्काळासारिखा भयंकर दुष्काळ पडल्याशिवाय कालवे बांधावे, सर्वत्र जोंधळे येणें संपें असावें हें त्यास कळत नाहीं. एकंदरीनें पाहिल्यास सर्व हिंदुस्थानास इंग्रजाचे राज्यापासून सुख झालें असें जें पुष्कळांचे मत आहे तसें आमचेंही मत आहे; असें असतां आह्मी हा त्यांस दोष लावितों याचें कदाचित् कोणास नवल वाटेल व कित्येकांस, नीट माहिती नसल्याकारणानें, रागही येईल. इंग्रजास हिंदुस्थानापासून जो लाभ होतो त्या मानानेंच हिंदुस्थानास इंग्रजापासून होतो असें कोणाच्यानें सिद्ध करवणार नाहीं. मि. नाइट यांनीं "द व्हाल्यू आफ इंडिया

ड इंग्लंड'' ह्या नांवानें जो निबंध केला आहे तो ज्यांनीं पाहिला असेल ते आमचें ह्मणणें समूळ मान्य आहे असें ह्मणतील हिंदुस्थान इंग्रजांचे हातीं आहे ह्मणून त्यांस सर्व पृथ्वीची गरज नाहीं. एवढें सामर्थ्य व ऐश्वर्य त्यांस आमच्या देशसत्तेमुळें आलें आहे. जर अमेरिकेंत लढाई उठली व तिकडून विलायतेस कापूस जाण्याचें बंद झालें व त्यांचेस्तारें येथील लक्षावधी लोक उपाशीं मरूं लागले तर, इकडून कापूस जाऊन त्यांचा व्यापार चालू होतो; इतकेंच नाहीं, परंतु हिंदुस्थानांतील धार्मिक लोक वर्गणी करून त्यास रुपयेही पाठवितात; आपलें येणें अगणित त्यांजकडे असतांही गरज पडल्यास करही देतात. जर इंग्रजांचें आज चिनी लोकांशीं वांकडें पडलें तर उद्यां जी त्यांच्या व्यापारांत हानि होईल ती हिंदुस्थान असल्या कारणानें होणार नाहीं. याप्रमाणें एक अमेरिकेचें व चिनाचेंच काय; परंतु सर्व पृथ्वींतील लोकांचें वांकडें पडल्यास जर हिंदुस्थान त्यांचे हातीं आहे तर कोणतेही गोष्टीची गैरसोय त्यांस पडणार नाहीं. हें मत आमचेंच आहे, व देशप्रीतीमुळें हा आमचा दुराग्रह आहे असें नाहीं; मोठमोठ्या विद्वान सत्पुरुष इंग्रजांचेंही असेंच मत आहे.

इंग्रज लोकांस स्वतंत्रतेची हौस असतां ते आपले हाताखालील लोकांस स्वतंत्रता देण्यास मोठे छद्र असें वास्तविक मत आहे. याविषयीं लार्ड मेकोले यांनीं असें ह्मटलें आहे:—

"इंग्रज लोक राजकीय गोष्टींविषयीं विचार करितांना एखादे निस्पृह तत्ववेत्त्यासारिखे सयुक्तिक व यथान्याय विचार करीत नाहींत. त्यांचें वकिलासारखें कुटिल पहाणें असतें. त्यांचे विचारामध्यें कांहीं तरी अल्पदृष्टीचें व आत्म-

---

१ हा निबंध, प्रोफेसर दादाभाई नवरोजी यांनीं इस्ट इंडिआ असोशिएशन सभेपुढें जो निबंध वाचिला तो इकडे प्रकट होण्याचे पूर्वी आम्हीं लिहिला हें येथें सांगणें इष्ट दिसतें.

ग्रामाचें आणि मारवाडीपणाचें असतेंच. लोकांचे हक्क ह्मणजे ईश्वराचे लाल जे इंग्रज यांचें उपभोगास ह्मणूनच केले आहेत असें त्यांस वाटतें. या हक्काचा उपभोग करण्यास दुसरी मनुष्यें प्रयत्न करूं लागलियास ते त्या लोकांस उत्तेजन तर देणार नाहींत; परंतु स्नेहभावानें देखील त्यांशीं वागणार नाहींत. *"

फ्रेंच लोकांचें वर्तन इंग्रज लोकांपेक्षां या गोष्टीमध्यें अगदीं निराळें आहे. फ्रेंच बादशाहींत अरब व मुसलमान या लोकांस जे हक्क लष्करी व इतर नौकऱ्यांत आहेत त्यांचे दशांश देखील आमचे देशांतील सुधारलेले लोकांस नाहींत. शेजारचा पांदेचरी वसाहतींत जे हक्क नेटिवांस आहेत ते इंग्रजी मुलकांत आह्मांस नाहींत.

अरब लोकांस फ्रेंच बादशाहींत लष्करी खात्यांत पाहिजे तो अधिकार देतात. आमचे राज्यांत शें दोनशें रुपयांचा सुभेदार मेजर झाला ह्मणजे झालें.

या "मारवाडीपणा" मुळें मोठ्या जागा आमचे लोकांस मिळत नाहींत.

इंग्रजांचें राज्य या देशांत होण्याचे वेळीं कित्येक बादशाहींच्या उत्कर्षामुळें व कित्येकांचे अपकर्षामुळें सर्व हिंदुस्थानभर अशी धांदल झाली कीं, तिचे योगें सर्व रयत शिणली. व ज्याप्रमाणें एखाद्याच्या अंगांत संचार व्हावा त्याचा मद उतरला ह्मणजे तो स्वस्थ निचेष्ट पडतो, त्याप्रमाणें आमचा देश कांहीं हालचाल केल्याशिवाय ती धांदल संपल्यावर स्तब्ध राहिला. अशा स्थितींत त्या शिणामुळें कसें तरी खायास मिळालें व बसावयास आश्रय मिळाला ह्मणजे कृतार्थ झालों असें त्यांस वाटून, गाई, गुरें इत्यादिकांप्रमाणें आमची स्थिति झाली. खाणें पिणें व आश्रय याशिवाय या जगांत दुसऱ्या कांहीं गोष्टी करण्यासारख्या व इच्छिण्यासारिख्या

* मेकॉलेस मिसलेनियस वर्कस.

आहेत हें ते अगदीं विसरून गेले. या गाढ निद्रेपासून आतां ते डोळे चोळीत चोळीत उठूं लागले आहेत. आतां पुरी झोंप जाण्यास किती दिवस लागतील याचा निर्णय कोण करील ? एका परमेश्वराशिवाय याचा निर्णय आज कोणास करतां येणार नाहीं. सध्या हिंदुस्थानची स्थिति अशी झाली आहे कीं, आजपासून पुढें दहा वर्षांनीं काय होईल हें सांगवत नाहीं. या समयीं ज्यानें त्यानें आपले देशाचे हिताकरितां जपावें एवढें मात्र आपलें कर्तव्य आहे.

इतकें हें सर्व हिंदुस्थानचे राज्याचें वर्णन पुढचा संदर्भ नीट कळावा ह्मणून लिहिलें. या राज्यांत जिवाचें व मालमत्तेचें चांगलें संरक्षण होतें; परंतु लोकांस इतर महत्व नाहीं असें आह्मीं यांत सांगितलें. ह्या आमचे अर्थाचा अनर्थ होऊं नये ह्मणून पुनः सांगतों.

आतां या विस्तीर्ण देशांतील ( ज्यास " कान्टीनेन्ट " ह्मणजे खंड असें ह्मटल्यास देखील शोभेल ) पृथक् पृथक् भागांतील लोकांचे हिताहिताचा विचार केला असतां वर जो निर्णय निघाला त्य पेक्षां निरनिराळे निर्णय निघतील. उदाहरणार्थ बंगाला, ओरिसा, व कांहीं नागपुराखालील प्रदेश यांस मोठाच लाभ झाला असें ह्मणतां येईल. शीख लोकांचा मुलूक, मराठ्यांचा मुलूक इत्यादि देशांत नफा व तोटा हे समान आहेत असें वाटेल. हिंदुस्थानांतील कोणत्याही इतिहासांत हा आह्मी जो भेद दाखविला हा लक्षांत ठेवणें अवश्य आहे. , हा पुष्कळ लिहिणारांचे लक्षांत नसल्याकारणानें अगणित चुक्या झाल्या आहेत. उदाहरणार्थ एक सांगतों. हिंदुस्थानांतील लोक भित्रे असें सरसकट दूषण दिलेलें असतें: आणि पुढें इतिहासाचे कथनांत शिवाजीचे राष्ट्रांतील लोकांची शिपाइगिरी, रणजीतसिंगाचे राष्ट्राची शिपाइगिरी, व रजपूत लोकांची शिपाइगिरी यांची वाहवा केलेली असते. याप्रमाणें होतां होतां सुमारें हिंदुस्थानांतील अर्ध्यांस

अर्धेक लोकसंख्येची शिपायांत गणना होते. यायोगें आपलेंच आपण खंडन केल्यासारखें दिसतें.

हिंदुस्थान अतिशय विस्तीर्ण आहे व ह्यांत अनेक जातीचे लोक आहेत, येणेंकरून ह्यांत एकी कमी आहे. मराठे लोक आपल्यास एक स्वतंत्र राष्ट्र असें मानितात; ह्याचप्रमाणें शीक, रजपूत, बंगाली, गुजराती, यांची गोष्ट आहे. व या इतक्यांस एक राष्ट्र कल्पिणें ह्मणजे युरोपांतील तुर्कस्थान खेरीज करून सर्व युरोप खंडास एक राष्ट्र ह्मणण्यासारखें कांहीं आहे. अशा लोकांस एक राष्ट्र मानून यांची राज्यनीति एकच असें कायतें आतांच झालें आहे. हें किती दिवस टिकेल व यापासून काय काय परिणाम होतील हें नीट आज सांगतां येत नाहीं.

याकरितां एक राज्याच्या ठिकाणीं तीन किंवा चार राज्यें होतील, तरी देखील चांगलें असें पुष्कळ मुत्सद्यांचें मत आहे. प्रत्येक "प्रसिडेन्सि" स्वतंत्र असावी असें त्याचें मत आहे, हें माझे अल्पबुद्धीस ठीक वाटतें. असो; जें झालें व जें होत आहे याचा विचार करून आतां आह्मी पुढें काय होईल या विचारांत शिरलों. व याविषयीं पूर्ण निर्णय एक ईश्वरावांचून कोणास होणार नाहीं असेंही आह्मीं सांगितलें. ह्मणून आतां आह्मी हा निबंध पुरा करतों.

हा निबंध बराच लांब झाला व यांतील सर्व विचारांचा एकाएकीं संबंध लक्षांत येण्यास कठीण ह्मणून थोडक्यांत पुनरावृत्ति करितों ती अशी:—प्रथमतः आह्मी या विषयावर ग्रंथ अगदीं कमी व ते सर्वमान्य नाहींत असें सांगून या विषयावरील एका प्रख्यात ग्रंथकाराचे गुणदोषांचें निरूपण केलें. पुढें हा विषय मनोरंजक होऊं शकतो असें दाखवून कांहीं जुनी माहिती सांगितल्यावर शिवाजीपासून मराठ्यांचा उत्कर्ष व राज्यनीति यांचें निरूपण शेवटच्या बाजीरावापर्यंत केलें. हें केल्यावर पुढें इंग्रजी राज्यावर जी आह्मी टीका केली ती

नीट समजावी असें झालें.यावर कांहीं पुढचाही विचार केला. गोष्टीचे कथनांतच ग्रांट डफ् साहेबांचे ग्रंथांतील गुणदोष दाखविल्यास मनोरंजन होईल असें वाटल्यावरून तसें-ही केलें. हा निबंध मूळ इंग्रजींत कांहींसे श्रम घेऊन आ-म्ही केला होता; परंतु त्या इंग्रजी लेखास निबंध असें म्हण-तां येणार नाहीं. त्यास ध्यानांत ठेवण्यासारिख्या गोष्टींचें व त्यावर वेळोवेळीं जे विचार सुचले त्याचें एक टिपण म्हट-ल्यास चालेल.या टिपणावरून फार घाईनें हा निबंध या सभेपुढें वाचण्यास आह्मी तयार केला. यांत भाषा व मजकूर जुळण्या-ची सरणी यांकडे आह्मीं लक्ष्य दिलेंच नाहीं, याची आम्हांस लोक क्षमा करतील. आतां या विषयाकडे कोणाचें लक्ष्य नाहीं, व तेणेंकरून आपलें फार अहित आहे, हा विषय मनोरंजक व महत्वाचा आहे, आणि यावर ग्रंथ केल्यास तो समर्पक व गहन असा होईल, इत्यादि गोष्टी मनांत ठसून जर या सभेंतील आज एक दोघांची तरी मनें या विषया-च्या अध्ययनाकडे लागतील तर सर्व आमचे हेतु सफळ झाले असें आह्मी समजूं.

समाप्त.